https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ६ वे अंक –३४४ शनिवार दि.२२ ऑगस्ट २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-344 Saturday, Dt.22 August 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# विलास घुले हत्या प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला विराट मोर्चा



### कडक कारवाई करावी तसेच पुरवणी जबाबातील आरोपींना अटक करण्याची आंदोलकांची मागणी

बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील टाकळी येथील हॉटेल व्यावसायिक विलास घुले हत्या प्रकरणी न्याय पाहिजे म्हणत हजारोंच्या उपस्थितीत विराट मोर्चा जिल्हा कचेरीवर धडकला असून, यावेळी आंदोलकांनी विलास घुले हत्या खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावा, पुरवणी जबाबातील आरोपींना अटक करा, याप्रकरणातील आरोपींवर कडक कारवाई करावी, विलास घुले यांच्या पत्नीला नोकरी द्यावी यासह विविध मागण्या करण्यात आल्या आहेत. यावेळी देण्यात आलेल्या घोषणांनी शहर दणाणून गेले होते. केज तालुक्यातील टाकळी येथील विलास घुले यांची निघृण हत्या प्रकरणातील सर्व दोषींवर कठोर कार्यवाही व्हावी व पिढीत कुटुंबाला न्याय मिळावा या मागणीसाठी मयत विलास घुले यांचे बंधु रमेश नवनाथ घुले व घुले परिवार ०५ ऑगस्ट, २०२६ पासून संविधानिक नियमाने व शांततेच्या मार्गाने जिल्हाधिकारी कार्यालया समोर अन्न पाणी त्याग आमरण उपोषणास बसले आहेत.

आज २१ ऑगस्ट, २०२६ रोजी या उपोषणाचा १७ वा दिवस पूर्ण होत आहे. तब्बल १७ दिवस उलटूनही प्रशासनाकडून पिडीत कुटुंबाला न्याय मिळण्याच्या दृष्टीने कोणतेही ठोस कारवाई झाली नसल्याचे दिसून येते. यामुळे या आंदोलनाला पाठिंबा म्हणून विराट मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल ते जिल्हाधिकारी कार्यालयावर समाज बांधवांनी विराट मोर्चा काढला आहे. यावेळी मोर्चा करांनी घुले कुटुंबाला न्याय द्यावा, विलास घुले यांच्या पत्नीला शासकीय नोकरी द्यावी, या कुटुंबाला आर्थिक मदत द्यावी, या मागणीसाठी हा विराट मोर्चा काढण्यात आला. तसेच यावेळी खासदारपुत्राला अटक झालीच पाहिजे, अमर रहे अमर रहे विलास घुले अमर रहे, घुले कुटुंबाला न्याय मिळालाच पाहिजे अशा घोषणा देण्यात आल्या आहेत. या घोषणांनी शहर दणाणून गेले.

# कमरेला गावठी कट्टा लावून हॉटेलमध्ये जेवणाऱ्या तरुणाच्या आवळल्या मुसक्या

### अंबाजोगाईतील शेपवाडी येथे कारवाई, गावठी पिस्तूल व दोन जिवंत काडतुसे असा ३२ हजारांचा मुद्देमाल जप्त

अंबाजोगाई प्रतिनिधी

कमरेला गावठी कट्टा (पिस्तूल) लावून हॉटेलमध्ये जेवणाऱ्या १९ वर्षीय तरुणास स्थानिक गुन्हे शाखेच्या (ङउइ) पथकाने ताब्यात घेतले. ही कारवाई दि. २० ऑगस्ट रोजी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील परळी रोडवरील शेपवाडी येथील हॉटेल लक्ष्मीनारायण येथे करण्यात आली. संशयिताकडून एक गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसे, असा अंदाजे ३२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या आदेशानुसार ङउइ पथक अंबाजोगाई उपविभागात अवैध धंद्यांविरोधात पेट्रोलिंग करीत असताना पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, शेपवाडी येथील हॉटेल लक्ष्मीनारायणमध्ये एक इसम कमरेला गावठी पिस्तूल लावून जेवण करीत आहे.

मिळालेल्या माहितीची वरिष्ठ अधिकाऱ्यांना कल्पना देऊन त्यांच्या आदेशाने पथकाने हॉटेलवर छापा टाकला. यावेळी संशयित इसम कमरेला गावठी कट्टा लावून जेवण करताना आढळून आला. पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव शुभम भारत वाघमारे (वय १९, रा. नाकलगाव, ता. माजलगाव, जि. बीड) असे सांगितले.

पोलिसांनी त्याच्या ताब्यातून एक गावठी कट्टा (पिस्तूल) आणि दोन जिवंत काडतुसे जप्त केली. याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. ३३८/२०२६, कलम ३/२५ भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास अंबाजोगाई शहर पोलीस करीत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषीकेश शिंदे आणि पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारुती कांबळे, विष्णू सानप, रामचंद्र केकान, गोविंद भताने, पोलीस अंमलदार सचिन आंधळे व चापोह अतुल हराळे यांच्या पथकाने केली.

# मागील पंधरा दिवसांपासून पावसाची पाठ

### पिके पाणी अभावी टाकताय माना हाता तोंडाशी आलेला घास हिरावण्याची भीती

मुखेड प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील जाहूर आणि अंबुलगा बु. महसूल मंडळात गेल्या दहा–बारा दिवसांपासून पावसाने पूर्णपणे दडी मारली असून सतत कडक ऊन पडत आहे. ऐन महत्त्वाच्या टप्प्यात पावसाने ताण दिल्याने खरीप पिके धोक्यात आली असून तोंडाशी आलेला घास हिरावून जाण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत.

यंदा सुरुवातीला समाधानकारक पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने सोयाबीन, कापूस, तूर आदी खरीप पिकांची पेरणी केली. सध्या सोयाबीन पीक फुलोऱ्यात असून शेंगा धरण्याच्या महत्त्वाच्या अवस्थेत आहे. मात्र, याच काळात पावसाने दडी मारल्याने पिकांना पाण्याची नितांत गरज निर्माण झाली आहे. जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत असून अनेक ठिकाणी पिके कोमेजण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

यंदाच्या हंगामात सुरुवातीला झालेल्या दमदार पावसामुळे काही भागात अतिपावसाचा फटका बसला, तर आता ऐन पिकांच्या वाढीच्या आणि उत्पादननिर्मितीच्या टप्प्यात पावसाने ताण दिल्याने कोरड्या दुष्काळाची परिस्थिती निर्माण होण्याची भीती आहे. त्यामुळे ओला दुष्काळ की कोरडा दुष्काळ, अशी विचित्र परिस्थिती निर्माण झाल्याने बळीराजा हवालदिल झाला आहे.

पिकांना सध्या पाण्याची सर्वाधिक आवश्यकता असताना पावसाने पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. आणखी काही दिवस पाऊस झाला नाही, तर सोयाबीनसह अन्य खरीप पिकांच्या उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.दहा–बारा दिवसांपासून सुरू



असलेले कडक ऊन आणि वाढता पावसाचा ताण यामुळे शेतकऱ्यांच्या नजरा आता आभाळाकडे लागल्या आहेत. हातातोंडाशी आलेले पीक पावसाअभावी वाया जाऊ नये, अशी चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. प्रशासनाने जाहूर व अंबुलगा बु. महसूल मंडळातील पिकांची प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीची नोंद घ्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.




# एस.आय.आर.ची मुदत संपली, दोन कोटी मतदारांच्या भवितव्यावर टांगती तलवार

बीड प्रतिनिधी महाराष्ट्रातील विशेष संक्षिप्त पुनर्निरीक्षण (ङखठ) मोहिमेअंतर्गत गणना प्रपत्र जमा करण्याची अंतिम मुदत संपल्याने दोन कोटींपेक्षा अधिक नागरिकांची नावे मतदार यादीतून वगळली जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे. निवडणूक आयोग मुदतवाढ देणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

प्रामुख्याने शहरी भागात गणना प्रपत्र न भरलेले किंवा अपूर्ण राहिल्याचे प्रमाण अधिक असून, संभाव्य वगळल्या जाणाऱ्या मतदारांपैकी जवळपास निम्मे मतदार मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे आणि पुणे या जिल्ह्यांतील असल्याचे सांगण्यात येत आहे.

दरम्यान, लवकरच प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होणार असून नागरिकांना त्यात आपले नाव तपासता येणार आहे. नाव नसल्यास अथवा गणना प्रपत्रातील माहिती चुकीची असल्यास निर्धारित कालावधीत दावा किंवा हरकत दाखल करता येणार आहे. त्यानंतर छाननी करून अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने पात्र मतदारांनी आपले नाव मतदार यादीत आहे की नाही, तसेच गणना प्रपत्रातील माहिती अचूक आहे की नाही, याची पडताळणी करून आवश्यक ती कार्यवाही करावी, असे आवाहन प्रा. बबनराव आंधळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# सौताडा घाटात बिबट्याचा मुक्त संचार, भुरेवाडीत शेळी ठार



### प्रवाशांसह शेतकऱ्यांमध्ये भीती, पिंजरा लावून रात्रीची गस्त वाढविण्याची मागणी

पाटोदा विशेष प्रतिनिधी

पाटोदा–जामखेड मार्गावरील सौताडा घाट परिसर आणि लगतच्या गावांत बिबट्याचा वावर वाढल्याने नागरिक, शेतकरी व प्रवाशांमध्ये घबराटीचे वातावरण आहे. पाटोदा तालुक्यातील भुरेवाडी येथे बिबट्याने शेळीवर हल्ला करून ठार केल्याची घटना घडली असून, सौताडा घाटातही बिबट्याचे दर्शन होत असल्याने नागरिकांमध्ये दहशत निर्माण झाली आहे.घाटातील रस्त्याची दुरवस्था होऊन मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे दुचाकीस्वारांना संथगतीने प्रवास करावा लागत असून, रात्री व पहाटेच्या वेळी बिबट्याच्या हल्ल्याचा धोका वाढला आहे. शेतकऱ्यांनाही रात्री पिकांना पाणी देण्यासाठी शेतात जाणे धोकादायक झाले आहे.

वनविभागाने तातडीने पाहणी करून योग्य ठिकाणी पिंजरा लावावा आणि सौताडा घाट परिसरात रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी ग्रामस्थ व शेतकऱ्यांकडून होत आहे. बिबट्याचा तातडीने बंदोबस्त न केल्यास मोठा अनर्थ होण्याची भीती व्यक्त होत आहे.

# जालना जिल्हा माहिती कार्यालयात पत्रकारांच्या सन्मानाचा मुद्दा ऐरणीवर..!

### जिल्हा माहिती अधिकाऱ्यांच्या कथित मनमानी विरोधात पत्रकार आक्रमक, जिल्ह्याबाहेर बदलीसह निष्पक्ष चौकशीची मागणी







जालना / प्रतिनिधी

पत्रकारांशी कथित गैरवर्तन, अपमानास्पद भाषा, शासकीय कार्यक्रमांच्या वृत्तांकनात अडथळे आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनांकडे दुर्लक्ष केल्याच्या आरोपांमुळे जालना जिल्हा माहिती कार्यालयातील कारभाराचा मुद्दा चांगलाच ऐरणीवर आला आहे. जिल्हा माहिती अधिकारी अरुण सूर्यवंशी यांच्या कथित वर्तणुकीविरोधात पत्रकारांनी संताप व्यक्त करत वरिष्ठ पातळीवर निष्पक्ष चौकशी करून त्यांची जिल्ह्याबाहेर तातडीने बदली करावी, अशी मागणी केली आहे.

अंबड चौफुली येथील शासकीय विश्रामगृहात पत्रकारांची बैठक झाली. यावेळी पत्रकारांना कथितपणे 'ब्लॅकमेलर', 'बोगस' संबोधणे, माहिती मागताना किंवा कार्यक्रमांच्या वृत्तांकनासाठी संपर्क साधताना उद्धटपणे वागणे, तसेच व्हीआयपी दौरे व शासकीय कार्यक्रमांच्या कव्हरेजमध्ये कथित अडथळे निर्माण केल्याच्या तक्रारी मांडण्यात आल्या.

'जिल्हाधिकारी माझे बॉस नाहीत' म्हणण्याचा आरोप.!

जिल्हाधिकारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनांकडे संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याचा आरोपही पत्रकारांनी केला. 'जिल्हाधिकारी माझे बॉस नाहीत' अशा आशयाची भाषा वापरल्याचा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या आरोपांची निष्पक्ष चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी करण्यात आली.

पत्रकारांसाठीच्या जागेवर कागदांचे साम्राज्य..

जिल्हा माहिती कार्यालयात पत्रकारांना बसण्यासाठी ठेवलेल्या खुर्च्या व टेबलांवर कागदांचे गठ्ठे ठेवण्यात आल्याने पत्रकारांसाठी जागाच उरली नसल्याची तक्रारही करण्यात आली. पत्रकारांनी कार्यालयात बसावे, प्रशासनाशी संवाद साधावा यासाठीची जागा मोकळी करावी, अशी मागणी पत्रकारांनी केली.

पत्रकार हा प्रशासन आणि जनतेमधील महत्त्वाचा दुवा असल्याने त्यांच्याशी सन्मानपूर्वक वागणे आवश्यक आहे. तक्रारी केवळ कागदावर न ठेवता निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळल्यास कारवाई करावी, अशी भूमिका बैठकीत घेण्यात आली.या बैठकीस संपादक भरत मानकर, कैलास फुलारी, आयेशा खान मुलानी, संतोष भुतेकर, बालाजी अडियाल, गणेश जाधव, दानम, विनोद काळे, अच्युत मोरे, शेख फारुक, ज्ञानेश्वर साळुंके, नाजिम सय्यद, सुशीलकुमार वाठोरे, समाधान खरात, ओमप्रकाश शिंदे, नरेश श्रीपत, दशरथ वाकोडे, लेवी निर्मल यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थित होते.दरम्यान, कैलास फुलारी, भरत मानकर, आयेशा खान मुलानी, ओमप्रकाश शिंदे, रवी दानम, गणेश जाधव, अर्पण गोयल, शेख फारुख, अच्युत मोरे, संतोष भुतेकर, नजीम सय्यद, नरेश अण्णा श्रीपत, ज्ञानेश्वर साळुंखे, साहिल पाटील, समाधान खरात, दशरथ वाकोडे, राहुल मुळे, सुशीलकुमार वाटोरे, संजय उपाध्ये, लेव्ही निर्मळ, बालाजी अडियल आदी पत्रकार व संपादकांच्या स्वाक्षऱ्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे.पत्रकारांच्या या गंभीर आरोपांवर प्रशासन आता काय भूमिका घेते आणि माहिती कार्यालयातील कथित अरेरावीला लगाम लागतो का, याकडे जालना जिल्ह्यातील पत्रकारांचे लक्ष लागले आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

संपादकीय....

## जलसमृद्ध महाराष्ट्रासाठी एकत्र येऊया...

पाण्याचा प्रश्न केवळ शासकीय योजनांमधून सुटणार नाही, त्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने यात सामील होऊन जबाबदारी स्वीकारणे गरजेचे आहे. आज वाचवलेला प्रत्येक थेंब उद्याच्या महाराष्ट्रासाठी महत्त्वाचा आहे. म्हणूनच २१ ऑगस्ट रोजी एकत्र येत जलसंधारणाचा संदेश देणार आहे.

महाराष्ट्र समृद्ध, हिरवागार आणि जलसमृद्ध व्हावा, यासाठी जलसंधारण ही केवळ शासनाचीच जबाबदारी न राहता ती लोकचळवळ होणे आवश्यक आहे. याच व्यापक उद्देशाने मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने २१ ऑगस्ट रोजी 'जलसंधारण दिन' साजरा करण्यात येतो. त्यानिमित्त राज्यभर विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त २१ ऑगस्ट रोजी जलसंधारण दिन साजरा केला जातो. यंदा १५ ते २१ ऑगस्टदरम्यान 'जलसंधारण सप्ताह' आयोजित करण्यात आला आहे. या कालावधीत जलसंधारणाचे महत्त्व समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यातील प्रमुख उपक्रम म्हणजे २१ ऑगस्ट रोजी सकाळी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये आयोजित करण्यात येणारी 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर'. हा उपक्रम या राज्यव्यापी उपक्रमातून जलसंधारणाबाबत व्यापक जनजागृती करण्याबरोबरच नागरिकांमध्ये पाण्याच्या संवर्धनाची जबाबदारी आणि त्यातील आपली भूमिका याविषयी जागर निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

'वॉक फॉर वॉटर' लोकजागृती अभियानाचे प्रतीक : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील नागरिकांना या महत्त्वपूर्ण जनजागृती अभियानात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. विशेषतः तरुणांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून जलसंधारणाचा संदेश समाजाच्या विविध घटकांपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन त्यांनी केले आहे. 'वॉक फॉर वॉटर' ही केवळ एक वॉकेथॉन नसून, पाण्याचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या व्यापक लोकजागृती अभियानाचे प्रतीक आहे. पाण्याची उपलब्धता, त्याचे संवर्धन आणि भविष्यातील पाणी सुरक्षेसाठी आजपासूनच सामूहिक प्रयत्न करण्याची गरज या माध्यमातून अधोरेखित केली जाणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड आणि मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी या मोहिमेत सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

महावॉकेथॉन २०२६ आणि मृद व जलसंधारण रील्स स्पर्धा : मृद व जलसंधारण विभागामार्फत स्वर्गीय सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त जलसंधारण सप्ताह व अभियान राबविण्यात येत आहे. याअंतर्गत महावॉकेथॉन २०२६ आणि मृद व जलसंधारण रील्स स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. महावॉकेथॉन २०२६ मध्ये ३ कि.मी. चालण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये पाणी वाचवा, पाणी जपा आणि सुरक्षित भविष्य घडवा हा संदेश देण्यात येणार आहे. यामध्ये प्रथम पुरस्कार २५ हजार रुपये आणि गौरव चिन्ह, द्वितीय पुरस्कार १५ हजार रुपये आणि गौरव चिन्ह, तर तृतीय पुरस्कार १० हजार रुपये आणि गौरव चिन्ह देण्यात येणार आहे. तसेच ईश्वरी चिठ्ठीद्वारे सात सहभागींना प्रत्येकी ३ हजार रुपयांचा पुरस्कार देण्यात येणार आहे.

# नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्याच जीवाची किंमत नाही, मग पूर्णेकरांचे काय?

## गाळाच्या ढिगाऱ्यात पाणीपुरवठा यंत्रणा; ठेकेदाराची मनमानी अन् नगरपालिका प्रशासनाचा कानाडोळा!

पूर्णा,प्रतिनिधी : शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या यंत्रणेची देखभाल करणाऱ्या नगरपालिका कर्मचाऱ्यांनाच जीव धोक्यात घालून काम करण्याची वेळ आली असेल, तर सर्वसामान्य पूर्णेकरांच्या सुरक्षिततेचे काय? असा संतप्त सवाल आता नागरिकांमधून उपस्थित होत आहे. जुन्या जलशुद्धीकरण केंद्रातील गाळ काढल्यानंतर त्याची योग्य विल्हेवाट न लावता पाणीपुरवठ्याच्या टाकीजवळच मोठ्या प्रमाणात गाळाचे ढिगारे करून ठेवण्यात आल्याने पाणीपुरवठा यंत्रणेचे 'वाल' बंद पडल्याचा आरोप आहे. हे 'वाल' पूर्ववत करण्यासाठी कर्मचाऱ्यांना चक्क गाळाच्या ढिगाऱ्यात उतरून काम करावे लागत आहे.

जलशुद्धीकरण केंद्रातील अनेक वर्षांचा गाळ काढण्याचे काम संबंधित कंत्राटदाराकडून करण्यात आले. मात्र, गाळ हटवून परिसर स्वच्छ करण्याऐवजी तो पाणीपुरवठा यंत्रणेच्या जवळच टाकण्यात आल्याने तीन ते चार फुटांपर्यंत गाळ साचल्याचे सांगण्यात येत आहे. अत्यावश्यक पाणीपुरवठा यंत्रणेभोवतीच असा अडथळा निर्माण झाल्याने नगरपालिका प्रशासनाच्या नियोजनाचा बोजवारा उडाल्याचे चित्र आहे.

विशेष म्हणजे, गाळामुळे पाणीपुरवठ्याचे महत्त्वाचे 'वाल' बंद पडले असतानाही तो तातडीने हटविण्यात आलेला नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांना धोकादायक परिस्थितीत उतरून काम करावे लागत आहे. कामाच्या ठिकाणी कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक साधने व उपाययोजना करण्यात आल्या आहेत का, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.

या प्रकाराची माहिती नगरपालिका मुख्याधिकारी डॉ. उत्कर्ष गुट्टे तसेच पाणीपुरवठा अभियंता राकेश जाधव यांना देण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, माहिती देऊनही गाळ हटविण्यासाठी ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्याच सुरक्षेकडे नगरपालिका लक्ष देत नसेल, तर पूर्णेकरांच्या जीवित व आरोग्याची काळजी कोण घेणार? असा सवाल आता नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

कंत्राटदाराने गाळ कुठे टाकायचा, याचे नियोजन केले होते का? पाणीपुरवठा यंत्रणेच्या अगदी जवळ गाळ टाकण्यास परवानगी कोणी दिली? कामाची पाहणी कोणत्या अधिकाऱ्याने केली? नियमांचे उल्लंघन झाले असल्यास संबंधित कंत्राटदारावर कारवाई का झाली नाही? या प्रश्नांची उत्तरे नगरपालिका प्रशासनाला द्यावी लागणार आहेत.

दरम्यान,डेमोक्रॅटिक यूथ फेडरेशन ऑफ इंडिया डी वाय एफ आय संघटनेने या प्रकाराचा निषेध केला असून संपूर्ण गाळ तातडीने हटविणे, बंद झालेले 'वाल' पूर्ववत करणे आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची योग्य व्यवस्था करण्याची मागणी केली आहे.

गाळ हटवा; अन्यथा तीव्र आंदोलन!



डी वाय एफ आय चे जिल्हा सचिव शेख नसीर कादरी यांनी नगरपालिका प्रशासनाला इशारा देताना सांगितले की, पाणीपुरवठा यंत्रणेच्या परिसरातील गाळ तातडीने हटवून कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची व्यवस्था करावी. ठेकेदाराची मनमानी आणि प्रशासनाचा निष्काळजीपणा थांबवला नाही, तर संबंधित कंत्राटदार व नगरपालिका प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

पाणीपुरवठा ही अत्यावश्यक सेवा असताना यंत्रणेभोवतीच गाळाचे ढिगारे आणि कर्मचाऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला असेल, तर प्रशासन अजून किती गंभीर परिस्थितीची वाट पाहणार? आता नगरपालिका प्रशासन कारवाई करणार की एखादी दुर्घटना घडल्यानंतरच जागे होणार,का अशी संतप्त प्रतिक्रिया डी वाय एफ आय संघटनेचे जिल्हा सचिव शेख नसीर कादरी दिली आहे.

### दिव्यांग शाळा अनुदानासह आयुक्तालयातील कथित घोटाळ्यांच्या चौकशीसाठी

# डॉ. जितेंद्र ओव्हाळ आक्रमक; मंत्री अतुल सावे यांची घेतली भेट

बीड । प्रतिनिधी

दिव्यांग शाळांना तातडीने अनुदान, द्या सचिव कार्यालय तसेच दिव्यांग कल्याण आयुक्तालयातील समायोजन घोटाळ्यासह विविध अनियमितता करणाऱ्याची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विकास मंचचे संस्थापक अध्यक्ष डॉ. जितेंद्र ओव्हाळ यांनी राज्याचे मंत्री अतुल सावे यांची शुक्रवारी छत्रपती संभाजी नगर येथे भेट घेतली.

या भेटीत दिव्यांग शाळांना अनुदान देण्यास होत असलेली दिरंगाई, तसेच आयुक्तालयातील कथित अनियमितता व घोटाळ्यांच्या आरोपांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. संबंधित प्रकरणांची निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी डॉ. ओव्हाळ यांनी केली.

दिव्यांगांच्या हक्काच्या निधीमध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता खपवून घेतली जाणार नाही. शाळांना अनुदान मिळणे हा दिव्यांग विद्यार्थ्यांचा आणि संस्थांचा हक्क आहे. शासनाने या प्रश्नाकडे तातडीने लक्ष न दिल्यास राज्यव्यापी जनआंदोलन उभारले जाईल, असा इशारा डॉ. जितेंद्र ओव्हाळ यांनी दिला.आयुक्तालयातील कथित गैरप्रकारांची चौकशी करण्यासाठी स्वतंत्र चौकशी समिती नेमावी, दोषी आढळणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी आणि दिव्यांग शाळांचे प्रलंबित अनुदान तातडीने वितरित करावे, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.दिव्यांगांच्या हक्कासाठी आता रस्त्यावर उतरून लढा देण्याची वेळ आली असून, शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा डॉ. जितेंद्र ओव्हाळ यांनी दिला.या



वेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंचचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते मंत्रालयात तातडीची बैठक लावून अनुदान देण्याची तसेच घोटाळेबाजावर कार्यबाही करण्याचे आश्वासन मंत्री अतुल सावे यांनी दिले असल्याची माहिती डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी दिली

## बंदेवाडीत रविवारी बाजीराव दादा चव्हाण यांच्या वतीने महाप्रसाद

अखंड हरिनाम सप्ताहामुळे परिसरात भक्तिमय वातावरण

बीड । प्रतिनिधी

श्री गुरु बंकट स्वामी महाराज, श्री गुरु चैतन्य बाळनाथ महाराज व लालगीर बाबा महाराज यांच्या आशीर्वादाने आणि ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली बंदेवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे. हरिपाठ, भजन, कीर्तन व नामस्मरणामुळे परिसर भक्तिमय झाला आहे.

सप्ताहानिमित्त युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या वतीने येत्या रविवारी भाविकांसाठी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या शुभहस्ते महाप्रसादाच्या पंगतीचा कार्यक्रम होणार आहे.



महाप्रसादाच्या कार्यक्रमाचे नियोजन शाहू जांभळे यांच्या वतीने करण्यात आले असून, भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी पंगती, प्रसाद वितरण व इतर व्यवस्थांचे नियोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमासाठी स्थानिक युवासैनिक व ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.

अखंड हरिनाम सप्ताहामुळे गावात एकोपा, बंधुभाव आणि आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले असून, भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. रविवारी होणाऱ्या महाप्रसादाचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६४७/२०२६**
**शेवंताबाई भ्र. चत्रभुज देवकते व इतर वि. निरंक**
**(मार्फत - अ‍ॅड. आर.ए. कोळेकर)**

ज्याअर्थी मयत नामे चत्रभुज पि. बाबासाहेब देवकते, रा. रेवकी ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक १३/०३/२०२३ रोजी रेवकी ता. गेवराई जि.बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ शेवंताबाई भ्र. चत्रभुज देवकते, वय ७० वर्षे, धंदा शेती, रा. रेवकी ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. २ साहेबराव पि. चत्रभुज देवकते, वय ४० वर्षे, धंदा शेती, रा. रेवकी ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ३ आश्राबाई भ्र. गंगाराम चोरमले, वय ५४ वर्षे, धंदा रेवकी, रा. रा. रेवकी ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ४ केसर भ्र. अंकुश काळे, वय ५५ वर्षे, धंदा शेती, रा. ठाकर आडगाव ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ५ सिताबाई भ्र. बाबासाहेब चोरमले, वय ३८ वर्षे, धंदा शेती, रा. रेवकी ता. गेवराई जि.बीड, यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन अ‍ॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत चत्रभुज बाबासाहेब देवकते यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २१/०८/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख - १४/१०/२०२६

**स्वाक्षरित/- क.लिपीक** (शिक्का) **आदेशावरून स.अधीक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर,गेवराई**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६४०/२०२६**
**भगवान पि.रामचंद्र बांगर वि.निरंक**
**मार्फत -अ‍ॅड.ए.बी.बांगर, गेवराई**

अर्जदार १. भगवान पि. रामचंद्र बांगर वय ७० वर्षे, धंदा शेती रा. उक्कडपिंपरी, ता. गेवराई जि. बीड

२. रघुनाथ पि. रामचंद्र बांगर वय ६५ वर्षे, धंदा शेती रा. उक्कडपिंपरी, ता. गेवराई जि. बीड

३. वसंत पि. रामचंद्र बांगर वय ६२ वर्षे, धंदा - शेती रा. उक्कडपिंपरी, ता. गेवराई जि. बीड

४. प्रभाकर पि. रामचंद्र बांगर वय ५५ वर्षे, धंदा - शेती रा. उक्कडपिंपरी, ता. गेवराई जि. बीड

ज्याअर्थी मयत रामचंद्र पि. माणिकराव बांगर हे/हया अनुक्रमे दिनांक १६/०४/२०२१ रोजी उक्कडपिंपरी, ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अ‍ॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत रामचंद्र पि. माणिकराव बांगर, रा. उक्कडपिंपरी, ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १९/०८/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख:- ०१/१०/२०२६

**स्वाक्षरित/- क.लिपीक** (शिक्का) **आदेशावरून स.अधीक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर,गेवराई**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ नागरी अर्ज क्रमांक ६३८/२०२६**
**मंदाबाई भ्र. सखाराम पुंड वि. निरंक**
**मार्फत - अ‍ॅड.आर.ए.कोळेकर, गेवराई**

अर्जदार

१. मंदाबाई भ्र. सखाराम पुंड
वय ५८ वर्षे, धंदा - शेती रा. रेवकी, ता. गेवराई जि. बीड

२. परमेश्वर पि. सखाराम पुंड वय ३९ वर्षे,
धंदा - शेती रा. रेवकी, ता. गेवराई जि. बीड

३. शरद पि. सखाराम पुंड वय ३० वर्षे,
धंदा - शेती रा. रेवकी, ता. गेवराई जि. बीड

ज्याअर्थी मयत सखाराम पि. ठकुबा पुंड हे/हया अनुक्रमे दिनांक ११/१०/२०१८ रोजी रेवकी, ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/ झाल्या आहेत. अर्जदार यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अ‍ॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत सखाराम पि. ठकुबा पुंड, रा. रेवकी, ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १९/०८/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीखः ०१/१०/२०२६

**स्वाक्षरित/- क.लिपीक** (शिक्का) **आदेशावरून स.अधीक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर,गेवराई**



### कर्जमाफी साठी फार्मर आयडी अपडेट करून

# शेतकऱ्यांची केवायसी अडचण दूर करावी -मागणी

अर्धापूर (प्रतिनिधी) : शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळण्यासाठी फार्मर आयडी अपडेट नसल्याने केवायसी प्रक्रिया करताना मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. फार्मर आयडी अपडेट नसल्यामुळे शेतकऱ्यांना केवायसी करण्यासाठी विलंब होत असून, कर्जमाफीच्या लाभापासून शेतकरी वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या कडे संबंधित विभागाने तातडीने लक्ष घालून शेतकऱ्यांचे फार्मर आयडी अपडेट करावेत, तसेच केवायसी प्रक्रिया सुलभ व त्वरित होण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळविण्यासाठी फार्मर आयडी अपडेट करणे अत्यंत आवश्यक असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची तातडीने दखल घेऊन संबंधित यंत्रणेला आवश्यक सूचना द्याव्यात, अशी मागणी जिल्हाधिकारी नांदेड तसेच तहसीलदार अर्धापूर यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यावेळी भाजप युवा मोर्चाचे माजी तालुकाध्यक्ष जठन पाटील मुळे, सामाजिक कार्यकर्ते तुळशीराम बंडाळे, शेतकरी विठ्ठल काकडे, भाजयुमोचे आनंद वैद्य, कुश भांगे, शेतकरी संतोष पवार, गणेश सीतापराव व दादाराव देशमुख यांनी निवेदन देऊन शेतकऱ्यांच्या समस्येकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली.

**जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/५७८**
**कार्यालय नगर परिषद,अंबड**
**दिनांक :- १८/०८/२०२६**
**जाहिरनामा**

अर्जदार श्री.सौ.श्रीमती :- शिरीन अजीम शेख

प्रकरण :- सिटी सर्व्हे नं. १८६२ न.प.घर नं.१४-९९/उ/५ चे हस्तांतरण करणे बाबत

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र.(१४-९९/उ/५ ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला -------------------- येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

जर कोणास या बद्दल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद,अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा,नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतु:सिमा:

पुर्व :- शेख अकबर यांनी याच सिटी सर्व्हे नंबर मधील खरेदी घेतलेली जागा

पश्चिम :- रस्ता

दक्षिण :- शेख निहाल शेख बखतर पटेल यांनी याच सिटी सर्व्हे नंबर मधील खरेदी घेतलेली जागा

उत्तर :- अक्रम युनूस सय्यद यांची जागा

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद,अंबड**

**प्रमाणपत्र मिळणे बाबत**
**अंबाजोगाई येथील श्रीम. प्रियंका जे. लिमाडे २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, अंबाजोगाई यांच्या न्यायालयात**
**किरकोळ अर्ज क्र.५३५/२०२६**
**रोहीणी वि. निरंक**

अर्जदार १. रोहीणी संजय देशपांडे उर्फ रोहिणी राजपाल कुलकर्णी, वय. ६१ वर्षे, धंदा घरकाम, रा. सारडा कॉलनी, गंगाखेड, ता. गंगाखेड जि. परभणी.

विरूध्द निरंक

अर्जदार क्र.१ च्या मयत राजपाल केशवराव कुलकर्णी व मयत निर्मला राजपाल कुलकर्णी हे अर्जदाराचे आई व वडील आहेत. मयत नामे राजपाल केशवराव कुलकर्णी हे दिनांक ०८/०७/२०११ रोजी मयत झाले आहेत. यांच्या मृत्यू पश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणुन अर्जदारास शासकीय व निमशासकीय कारणासाठी ते मयताचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारस प्रमाण पत्राची आवश्यक्ता आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखे पासुन एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेख्यावरच असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदत्तीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर कोर्ट सदरहून अर्जदार हयांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र देईल पुढील तारीख २२/०९/२०२६ नेमुण देण्यात आलेली आहे.

आज ता. २१ माहे ०८ सन २०२६ रोजी माझ्या सहीशिनी व न्यायालयाचे शिक्क्या निशी दिला.

(शिक्का) **आदेशावरून स.अधीक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर,अंबाजोगाई**

**टी.सी. हरवला आहे**

प्रधान यश विजय या नावाचा इयत्ता दहावी उत्तीर्ण वर्गाचा महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड येथील टी.सी. गेवराई ते बीड प्रवासादरम्यान हरवला आहे.सदर टी.सी. कोणास सापडल्यास कृपया खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

संपर्क क्र.: ९३५९८२३१८२

# व्यंकटेश सोळके यांच्या अरसड कादंबरीला बी रघुनाथ पुरस्कार जाहीर

नायगाव प्रतिनिधी

नायगाव तालुक्यातील जवाहरलाल नेहरू मा. विद्यालय बरबडा येथील शिक्षक मराठी साहित्यीक बी. रघुनाथ यांची पुण्यतिथी निमित्ताने छत्रपती संभाजीनगर शहरांत बी. रघुनाथ स्मृती सोहळा म्हणुन साजरी केली जाते. परभणी येथे बी. रघुनाथ महोत्सव घेतल्या जातो.

या वर्षीच्या बी. रघुनाथ पुरस्कारासाठी व्यंकटेश सोळंके यांच्या 'अरसड' या कादंबरीची निवड करण्यात आली. ही कादंबरी लोकवाङ्मय गृह मुंबई यांनी प्रकाशीत केली आहे.

मराठी साहित्यविश्वात आपल्या लेखनाने स्वतंत्र ठसा उमटविणारे ज्येष्ठ साहित्यिक व्यंकटेश सोळंके यांच्या 'अरसड' या अत्यंत चर्चित कादंबरीची यंदाच्या प्रतिष्ठित 'बी. रघुनाथ पुरस्कारासाठी ' निवड झाली आहे.

विशेष आनंदाची बाब म्हणजे, सोळंके यांच्या साहित्यिक कारकिर्दीतील हा पहिलाच साहित्यकृती पुरस्कार आहे. त्यांच्या 'अरसड' कादंबरीला मिळालेला हा सन्मान त्यांच्या संवेदनशील लेखनशैलीचा, सामाजिक जाणिवेचा आणि साहित्यिक



व्यंकटेश सोळंके जवाहरलाल नेहरू कनिष्ठ महाविद्यालय, बरबडा, ता. नायगांव, जि. नांदेड येथे प्राध्यापक आहेत.

विविध नियतकालीके, मासिके यातुन नियमीत लिखाण करणारे सोळंके यांची ही पहिलीच साहित्यकृती आहे.

अक्षरायण समीक्षा सदर व शेतीचे अर्थकारण ह्या लेखमाला लिहिलेल्या आहेत.

बी. रघुनाथ स्मृती सोहळ्याचे आयोजन परभणीकर मित्र मंडळ व साहित्य संगीत कला मंचच्या वतीने दरवर्षी करण्यात येते. यापुर्वी हा पुरस्कार श्रीकांत सराफ यांच्या 'तितर बितर' या कादंबरीस, इंद्रजीत भालेराव यांच्या 'भुईचे लळासे' या कविता संग्रहास, प्रसाद कुमठेकर यांच्या 'इत्तर गोष्टी' या कथा संग्रहास देण्यात आला आहे. पुरस्काराचे हे चौथे वर्ष आहे.

पुरस्कार वितरण सोहळा रविवार दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे.पुरस्कार निवड समितीच्यावतीने संयोजक श्रीकांत उमरीकर यांनी ही माहिती दिली.आहे .

# शहागड पत्रकाराच्या घरावर तलवारीने हल्ला वडिलांसह पत्रकार गंभीर जखमी

## शेळी घरासमोर आल्याचा क्षुल्लक वाद विकोपाला घरावर दगडफेक लाठ्या-काठ्यांनी नासधूस

डोक्यात तलवारीचा वार भाऊ, पत्नी,आई व चिमुकली मुलेही भयभीत

अंबड प्रतिनिधी :-

शेळी घरासमोर आल्याच्या क्षुल्लक कारणावरून सुरू झालेल्या वादाचे पर्यवसान थेट तलवारीच्या हल्ल्यात झाल्याची संतापजनक घटना शहागड येथे घडली. दैनिक किसानचे तालुका प्रतिनिधी अश्फाक शेख यांच्या घरावर कथित हल्लेखोरांनी दगडफेक करीत लाठ्या-काठ्यांनी घराची नासधूस केली. त्यानंतर तलवारीने हल्ला करून रहीम अहेमद शेख यांच्या डोक्यात वार केल्याचा गंभीर आरोप कुटुंबीयांनी केला आहे. या हल्ल्यात रहीम अहेमद शेख गंभीर जख्मी झाले असून पत्रकार अश्फाक शेख व त्यांचे भाऊ जख्मी झाले आहे

मिळालेल्या माहितीनुसार शेळी घरासमोर आल्याच्या कारणावरून काही व्यक्तींनी शेख कुटुंबीयांशी वाद घातला. यावेळी अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. वाद वाढत गेल्यानंतर संबंधितांनी शेख यांच्या घरावर दगडफेक करण्यास सुरुवात केल्याचे सांगण्यात येते. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे घरातील महिला व चिमुकल्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

दगडफेकीनंतर तलवारीने हल्ला

हल्लेखोरांनी लाठ्या-काठ्या व दगडांचा वापर करून घराची नासधूस केली. त्यानंतर तलवार घेऊन घरावर हल्ला करण्यात आल्याचा आरोप आहे. याच वेळी रहीम अहेमद शेख यांच्या डोक्यात तलवारीने वार करण्यात आल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. या हल्ल्यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून त्यांचे वडील रहीम अहमद शेख हेझगंभीर जखमी झाले.

घरातील चिमुकल्यांचा थरकाप

हल्ल्यावेळी घरात असलेल्या दोन लहान मुलांनी हा थरार अनुभवला. तलवार, दगड आणि लाठ्या-काठ्यांनी झालेल्या हल्ल्यामुळे चिमुकल्यांसह संपूर्ण कुटुंब हादरून गेले. अश्फाक शेख यांच्या पत्नी व आई घराबाहेर असताना त्यांच्या दिशेने तसेच मोटारसायकलवरही दगडफेक करण्यात आल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे आहे.

पत्रकारांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

पत्रकाराच्या घरात घुसून किंवा घरावरच शस्त्रांनी हल्ला होण्याची घटना गंभीर मानली जात आहे. पत्रकार आपले कर्तव्य बजावत असताना त्यांच्या कुटुंबीयांनाही लक्ष्य केले जात असेल तर ही बाब पत्रकारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने चिंताजनक असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. या घटनेमुळे शहागड परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

हल्लेखोरांवर कठोर कारवाईची मागणी

घटनेची पोलिसांनी तातडीने आणि निष्पक्ष चौकशी करून हल्ल्यात सहभागी असलेल्या सर्व व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी पत्रकार बांधवांसह नागरिकांकडून होत आहे. हल्ल्यात तलवारीचा वापर झाला असल्याने



प्रकरण गांभीर्याने घेऊन संबंधितांवर कठोर कलमांखाली कारवाई करावी, अशीही मागणी होत आहे.

दरम्यान या प्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून हल्ल्यामागील नेमके कारण सहभागी व्यक्ती शस्त्रांचा वापर आणि घटनेचा संपूर्ण घटनाक्रम याबाबत पोलिस तपासानंतर अधिकृत माहिती स्पष्ट होणार आहे.

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून दोघा रुग्णांना १ लाख रुपयांची मदत

## आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून तिंतरवणी व पाटोदा तालुक्यातील रुग्णांना दिलासा

पाटोदा / प्रतिनिधी :

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून पाटोदा तालुक्यातील गरजू रुग्णांना उपचारासाठी आर्थिक मदत मिळवून देण्याचे काम सुरू असून, प्रकाश थोरे (रा. तिंतरवणी, ता. शिरूर कासार) यांच्या वैद्यकीय उपचारांसाठी ८० हजार रुपये मंजूर करण्यात यश आले आहे. तसेच अपघातग्रस्त रुग्ण विश्वनाथ जरे यांच्या उपचारासाठी २० हजार रुपये मंजूर झाले आहेत. त्यामुळे दोन्ही रुग्णांच्या कुटुंबांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे.

प्रकाश थोरे यांच्या उपचारासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून मदत मिळविताना कागदपत्रांबाबत काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. या त्रुटी दूर करण्यासाठी अमर वाळके यांनी आवश्यक ते सहकार्य करून कागदपत्रांची पूर्तता करण्यात पुढाकार घेतला. त्यांच्या सहकार्यामुळे थोरे यांना ८० हजार रुपयांची मदत मंजूर होऊ शकली.

दरम्यान, पाटोदा तालुक्यातील विश्वनाथ जरे यांचा काही दिवसांपूर्वी अपघात झाला होता. सध्या त्यांच्यावर श्रीदीप हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे उपचार सुरू असून, त्यांच्या उपचारासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून २० हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत.



ही दोन्ही प्रकरणे आमदार सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून मार्गी लागली. रुग्णांना मदत मिळवून देण्यासाठी आमदार सुरेश धस यांच्या रुग्ण मदत विभागाचे पाटोदा येथील सहाय्यक ड. महेश बेदरे आणि सोमीनाथ कोल्हे यांनी आवश्यक ते सहकार्य केले.

गरजू रुग्णांना उपचारासाठी आर्थिक मदत मिळवून देण्याच्या या प्रयत्नामुळे संबंधित रुग्णांच्या कुटुंबांना मोठा आधार मिळाला असून, मदत मिळालेल्या कुटुंबीयांनी आमदार सुरेश आण्णा धस आणि त्यांच्या टीमचे आभार व्यक्त केले.

# विद्यार्थी प्रकाशनातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव: प्राचार्य डॉ. सुहास मोराळे

स्वा. सावरकर महाविद्यालयात 'विद्यार्थी प्रकाशन निर्मिती कार्यशाळा' संपन्न

बीड (प्रतिनिधी):

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाईच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त (२०२६-२७) स्थानिक स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड येथील सहभागी शिक्षण आणि विद्यार्थ्यांचे वॉलपेपर सादरीकरण व प्रकाशन समितीच्या वतीने 'मार्गदर्शक आणि विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी प्रकाशन निर्मिती कार्यशाळा' आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी, विद्यार्थी प्रकाशनासारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना, लिखाणाला आणि सर्जनशीलतेला मोठे व्यासपीठ मिळते, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपप्राचार्य डॉ. रमेश खंडागळे यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी महाविद्यालयात राबवल्या जाणाऱ्या या नाविन्यपूर्ण उपक्रमाची पार्श्वभूमी आणि तिचे शैक्षणिक महत्त्व उपस्थितांसमोर मांडले.

या कार्यशाळेत झडडथझझउ समितीच्या प्रमुख व मार्गदर्शक डॉ. अनुजा




कास्तीकर यांनी विद्यार्थ्यांना हस्तलिखित वॉलपेपर, डिजिटल वॉलपेपर निर्मितीचे निकष, विषयाची निवड, आकर्षक मांडणी, मार्जिन व 'गौरव' भित्तिपत्रकाचे प्रमाणित स्वरूप याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच वर्षभरात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या विद्यार्थ्याला 'थरश्रश्र-चरसरूळपश -ींहेी ेष ींहश धशरी' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, आभार प्रदर्शन आणि तंत्र सहाय्य प्राध्यापक प्रतिनिधी प्रा. संजय काळे यांनी मानले.

या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ. रमेश खंडागळे विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शासनाच्या परिपत्रकाला तालुका कृषी कार्यालयाची केराची टोपली..!

## अंदाधुंद कार्यप्रणाली, कर्मचाऱ्यांचा बेपत्ता, शेतकरी वैतागले.!

धर्माबाद / अशोक पडोळे

येथील तालुका कृषी कार्यालयात अगदी अंधाधुंद कार्यप्रणाली गेल्या वर्षभरापासून चालू असून या कार्यालयात जवळपास सर्वच कर्मचाऱ्यांचा बेपत्ता असतो,काही कर्मचारी अचानक पणे कार्यालयात उगवतात आणि अचानकपणे गायबही होतात. या कार्यक्रमाला धर्माबाद तालुक्यातील शेतकरी अतिशय वैतागले असून विभागीय कृषी सहसंचालक लातूर विभाग लातूर यांनी संबंधित कार्यालयातील क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांची मुख्यालय/कार्यक्षेत्रातील नियमित,उपस्थिती क्षेत्रीय कामकाजाचे प्रभावी पर्यवेक्षण व सनियंत्रण करण्यासंदर्भात चार आगस्ट २०२६ रोजी काढलेल्या परिपत्रकाला तर धर्माबादच्या तालुका कृषी कार्यालयाकडून अक्षरशः केराची टोपली दाखवण्यात आली आहे.

राज्यातील शेतकऱ्यांना विविध योजना, पीक सल्ला, पीक पाहणी,नुकसान पंचनामे,ई-पीक पाहणी, ॲग्रीस्टक, बियाणे- खते उपलब्धता, तक्रार निवारण तसेच इतर क्षेत्रीय सेवा प्रभावीपणे देण्यासाठी क्षेत्रीय यंत्रणेने त्यांच्या कार्य कक्षेत गावामध्ये नियमित उपस्थिती राहून शेतकऱ्यांशी संवाद साधने, पीक परिस्थिती योजनेची अंमलबजावणी व शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनानुसार क्षेत्रीय कामकाज करणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र काही ठिकाणी पीक पेरणी खरीप हंगाम मोहिमा क्रॉपसप इत्यादी कामकाजाबाबत काही कर्मचारी व पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांनी अहवाल नोंदणी, निरीक्षणे भरणे ,ही कामे केलेली नाहीत असे नुकत्याच झालेल्या सर्वे मध्ये निष्पन्न झाल्यामुळे विभागीय कृषी सहसंचालक लातूर विभाग लातूरने एक परिपत्रक ४ ऑगस्ट रोजी जारी केले.

तालुका कृषी कार्यालयातील सद्यस्थितीत तालुका कृषी अधिकारी म्हणून बिलोलीचे तालुका कृषी अधिकारी हे प्रभारी आहेत. त्यांचा तर पत्ताच नसतो. तसेच कृषी सहाय्यक म्हणजे सहाय्यक कृषी अधिकारी यांची १२पदे आहेत पण कुणाकड कोणते गावे आहेत हे आतापर्यंत ठळकपणे कुणालाच माहीत नाही. कृषी सुपरवायझर म्हणजेच उप कृषी अधिकारी यांची दोन पदे आहेत, तसेच मंडळ विस्तार अधिकाऱ्यांचे एक पद आहे या सर्वांनाही कशा पद्धतीने कार्य करावे याचे दिशा निर्देश दिलेले आहेत.

सर्वांनाच सहाय्यक कृषी अधिकारी यांच्यामार्फत सुरू असलेल्या क्षेत्रीय कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यकतेनुसार जीपीएस मोबाईल लोकेशन फोटो, व्हिडिओ कॉल आणि विभागाने उपलब्ध करून दिलेल्या डिजिटल प्रणालीवर संबंधित अधिकाऱ्यांनी केलेले कामकाज याचा वापर करून उपस्थितीची पडताळणी व सनियंत्रण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांचे मुख्यालय व कार्यक्षेत्रातील नियमित उपस्थिती, क्षेत्रीय कामकाजाचे प्रभावी परिवेक्षण व सहनियंत्रण करणे याकरिता दररोज सहाय्यक कृषी अधिकारी व उपकृषी अधिकारी यांनी त्यांच्या नेमून दिलेल्या कार्य क्षेत्रात उपस्थित राहणे अनिवार्य आहे. तद्वतच त्या ठिकाणाहून लोकेशन शेअर करणे, उपस्थिती नोंदवण्यासाठी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या गुगल मॅपचे लोकेशन मंडळ कृषी अधिकारी यांना व्हाट्सअप द्वारे शेअर करणे जिओ टॅग फोटो गुगल मॅप लोकेशन शेअर करण्यास अडचणी येत असल्यास पाठवणे, तसेच वेळेच्या नियोजनात उपस्थिती आणि लोकेशन शेअर करण्याची कारवाई दररोज दोन वेळा करणे बंधनकारक करण्यात आले. सकाळची नोंद ही अकरा वाजता तर सायंकाळी ची नोंद ही पाच वाजता संबंधित परिपत्रकात ठेवण्यात आली आहे.

जर संबंधित कार्यालयाचा एखादा कर्मचारी अधिकारी कार्यकक्षेत नसेल तालुका मुख्यालय निवडणूक कामावर, जनगणनेचे काम, प्रशिक्षण किंवा कोणत्याही शासकीय कामावर नियुक्त असेल तरीही त्याने तो त्या ठिकाणी उपस्थिती असेल तिथूनच आपली वरील प्रमाणे उपस्थिती नोंदणी करणे अनिवार्य केले आहे. या ठरवून दिलेल्या कार्यप्रणालीची योग्य प्रकारे अमलबजावणी होत आहे की नाही याची खातरजमा म्हणजेच क्रॉसचेक आणि आढावा तालुका कृषी अधिकारी उपविभागीय कृषी अधिकारी जिल्हा कृषी अधिकारी कृषी अधिकारी या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्प्रेड सीटच्या आधारे वेळोवेळी घेणे अपेक्षित आहे. धर्माबाद तालुक्यातील तालुका कृषी कार्यालयातील बहुतांशी कर्मचारी हे मुख्यालय राहतच नसल्याचे धक्कादायक वृत्त असून ते बहुदा नांदेडचे परभणीहून येणे जाणे करीत आहे व घर भाडे व इतर भत्ता उचलत असून अशा कर्मचाऱ्यांची ही चौकशी होणे गरजेचे आहे.

उपरोक्त पार्श्वभूमीवर अतिशय विस्कळीत झालेल्या तालुका कृषी कार्यालयाचा कारभार सुरळीत करावयाचा असल्यास नवीन परिपत्रकाप्रमाणे सर्व कर्मचारी अपडेट राहणे गरजेचे आहे. आज तालुका कृषी अधिका-यांपासून सर्वच कर्मचारी आपल्या मनाला येईल तेव्हाच कार्यालयात येत असून मनाला येईल तेव्हा कुठेही निघून जात आहेत. वरिष्ठांनी त्यांच्या कामावर बारकाईने लक्ष ठेवणे गरजेचे असून असे न झाल्यास काही सामाजिक कार्यकर्ते व प्रसार माध्यमाचे प्रतिनिधी यांनी तालुका कृषी कार्यालयाच्या सर्वच कर्मचाऱ्यांच्या उपस्थिती बाबत सत्यता पडताळणार असल्याचे ठरले आहे.

# शाळेच्या कारभाराचे फोटो काढायलाही परवानगी ?

## 'स्कूल ठीक करो' अभियानाला प्रशासनाचा आळा घालण्याचा प्रयत्न - डॉ. गणेश ढवळे

बीड प्रतिनिधी

जिल्हा परिषद शाळांमधील पिण्याचे पाणी, अस्वच्छ शौचालये, तुटलेल्या खिडक्या व मूलभूत सुविधांचा अभाव समोर आणणाऱ्या 'स्कूल ठीक करो' अभियानाला प्रशासन आळा घालण्याचा प्रयत्न करीत आहे का? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे यांनी केला आहे.



कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी १५ ऑगस्टपासून सुरू केलेल्या या अभियानातून ग्रामीण भागातील शाळांची स्थिती फोटो व व्हिडिओद्वारे सोशल मीडियावर मांडली जात आहे.

दरम्यान, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रेहमान यांनी २० ऑगस्ट रोजी घेतलेल्या बैठकीनंतर गटशिक्षणाधिकाऱ्यांमार्फत केंद्रप्रमुखांना सूचना देण्यात आल्या. बीड पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी प्रणिता गंगाखेडकर यांनी दिलेल्या सूचनेनुसार, शाळेच्या वेळेत शाळाबाह्य व्यक्तींनी फोटो अथवा व्हिडिओ काढण्यापूर्वी मुख्याध्यापकांची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच शाळेच्या वेळेत अशी परवानगी देऊ नये, अशाही सूचना आहेत.

'पोलखोल थांबविण्यासाठी नवा फतवा?'

शाळांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव असताना त्याचे फोटो-व्हिडिओ काढणाऱ्यांना रोखण्याऐवजी प्रशासनाने समस्या सोडवाव्यात. 'विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे कारण देत शाळांची पोलखोल थांबविण्याचा प्रयत्न का ?' असा सवाल डॉ. गणेश ढवळे यांनी केला.

शाळांची अवस्था दाखविणाऱ्यांना रोखण्याऐवजी शाळांची अवस्था सुधारा. आदेशामागील नेमका उद्देश काय ? जिल्हा प्रशासनाचे डोके ठिकाणावर आहे का ? असा संतप्त सवालही त्यांनी उपस्थित केला.

शाळांच्या पारदर्शक कारभारासाठी पालक, शाळा व्यवस्थापन समिती, सरपंच, शिक्षणप्रेमी आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा सहभाग आवश्यक असल्याचेही डॉ. ढवळे यांनी म्हटले आहे.

# राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक सोमनाथ वाळके यांची जामगाव केंद्रप्रमुखपदी नियुक्ती

आष्टा येथे आज भव्य निरोप समारंभ

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) तालुक्यातील आष्टा हरिनारायण येथील पीएमश्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, आष्टा हरिनारायण येथे कार्यरत असलेले शाळेचे विद्यार्थी प्रिय शिक्षक व राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक सोमनाथ वामन वाळके सर यांची केंद्रप्रमुख, जामगाव पदावर नियुक्ती झाल्याबद्दल त्यांच्या सन्मानार्थ शाळेच्या वतीने निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम आज शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता शाळेच्या परिसरात आयोजित करण्यात आला आहे.



सोमनाथ वामन वाळके यांनी आष्टा येथील पीएमश्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून त्यांनी आपल्या शैक्षणिक व सामाजिक कार्यातून उल्लेखनीय ठसा उमटविला आहे. शिक्षक म्हणून कार्यरत असताना त्यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विविध उपक्रमांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याची दखल घेत त्यांना यापुर्वीच राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.

आता त्यांच्या कार्याची पुढील जबाबदारी केंद्रप्रमुख, जामगाव या पदावर सोपविण्यात आली आहे.

वाळके सरांच्या पदोन्नतीबद्दल व नवीन जबाबदारीबद्दल त्यांचा गौरव करून त्यांना निरोप देण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक रघुनाथ मुटकुळे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, आष्टा शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व सदस्य आणि ग्रामपंचायत आष्टा चे सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्य यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या निरोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी अमर राजे निंबाळकर, जिल्हा परिषद सदस्य, आष्टा हे राहणार आहेत.

कार्यक्रमास आष्टा शाळेचे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष साईनाथ गळगटे, उपाध्यक्ष संजय पठाडे व सर्व सदस्य, तसेच ग्रामपंचायत आष्टा चे सरपंच गणेश माळवे, उपसरपंच वैभव पठाडे व सर्व सदस्य यांचीही कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

सोमनाथ वामन वाळके सरांच्या शैक्षणिक प्रवासात त्यांनी मिळविलेला राष्ट्रपती पुरस्कार आणि आता केंद्रप्रमुखपदी झालेली नियुक्ती ही आष्टीच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. त्यामुळे या निरोप समारंभाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. वाळके सरांनी आपल्या शैक्षणिक कार्यातून विद्यार्थ्यांना दिलेली प्रेरणा, केलेले मार्गदर्शन आणि शिक्षण क्षेत्रातील योगदान याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्यांच्या पुढील प्रशासकीय व शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यासाठी नागरिक, पालक, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षणप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# सिडको क्षेत्रीय कार्यालय येथे मनपा स्थायी समिती सभापती विरेंद्र सिंग गाडीवाले यांच्यी भेट,आढावा व पाहणी..

नवीन नांदेड - मनपाचे स्थायी समिती सभापती विरेंद्र सिंग गाडीवाले यांनी सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत भेट देऊन मातृ सेवा आरोग्य केंद्र सह , सिडको स्मशानभूमी, साई मंगल कार्यालय हडको या ठिकाणी भेट देऊन पाहणी केली असून लवकरच साई मंगल कार्यालय येथे मातृ सेवा आरोग्य केंद्र येथे स्थलांतर करून सुसज्ज इमारत मध्ये करण्याचा व सिडको स्मशानभूमी विकसित करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे मनपा स्थायी समिती सभापती विरेंद्र सिंग गाडीवाले यांनी केला, यावेळी सिडको परिसरातील नगरसेवक व उपायुक्त अजितपाल संधू व कर्मचारी उपस्थित होते.

नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका सिडको क्षेत्रीय कार्यालय येथे २१ ऑगस्ट रोजी मनपाचे स्थायी सभापती विरेंद्र सिंग गाडीवाले यांच्या सह स्विकृत नगरसेवक अंकुश देवसरकर, प्रभाग क्रमांक २०चे भाजपाचे नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, नगरसेवक प्रतिनिधी राजु लांडगे सौ.सुर्वणा सतिश बसवदे, उपायुक्त अजितपाल संधू,क्षेत्रीय कार्यालय सहाय्यक आयुक्त डॉ.मिर्झा बेग,वैद्यकीय अधिकारी संतोष शिंदे, बांधकाम विभाग कनिष्ठ अभियंता ठाणेदार, आरोग्य विभागाचे बिझमवाड, सोनुले, वैद्यकीय संतोष शिंदे, यांच्या सह मनपा सिडको क्षेत्रीय कार्यालय कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी संजय पाटील घोगरे,वैजनाथ देशमुख,सौ.सुर्वणा बस्वदे,नगरसेवक प्रतिनिधी राजु लांडगे यांनी सिडको परिसरातील मातृ सेवा आरोग्य केंद्र येथे रूग्णांना औषध पुरवठा तुटवडा असल्याने तात्काळ औषध पुरवठा करावा, ओपीडी वेळ वाढवून द्यावी, स्मशानभूमी पाहणी, साई मंगल येथे सुसज्ज इमारत करून मातृ सेवा आरोग्य केंद्र स्थलांतरित करावे,सिडको स्मशानभूमी पाहणी,मातृ सेवा आरोग्य केंद्र फक्त दोन तास चालू असल्याने सर्वसामान्य रूग्णांना वेळेचा आता येत येत नसल्याने रूग्णालय तपासणी वेळ वाढवून द्यावी, सिडको स्मशानभूमी मध्ये मृतदेह दफन करण्यासाठी जागा अपुरी पडत असल्याने जागा वाढ व संरक्षण भिंत व नवीन कार्यान्वित होणारी अत्याधुनिक दहन वाहिनी सुरू असलेल्या बांधकाम पाहणी यासह लोकप्रतिनिधीं केलेल्या मागण्या बाबत सकारात्मक विचार करण्यात आला.

यावेळी उपस्थित पदाधिकारी व अधिकारी यांनी स्मशानभूमी सह , मातृ सेवा आरोग्य केंद्र ओपीडी वेळ वाढवून देणे, औषध पुरवठा कायमस्वरूपी करण्यासाठी व ईतर मागण्यांची दखल घेतली असून मातृ सेवा आरोग्य केंद्र, सिडको क्षेत्रीय कार्यालय,साई मंगल कार्यालय,पाहणी केली. यावेळी सिडको क्षेत्रीय कार्यालय अधिकारी, करनिरीक्षक, वसुली लिपीक यांच्यी उपस्थिती होती.



# १३ वर्षीय बालकाची वेठबिगारीतून सुटका दोन शेतमालकांवर गुन्हा

भोकरदन इसरारखान पठाण :- पुणे येथील चाइल्ड हेल्पलाइन १०९८ वर प्राप्त झालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे जालना जिल्हा प्रशासनाने तातडीने कारवाई करत भोकरदन तालुक्यातील मौजे चिंचोली शिवारातून १३ वर्षीय अल्पवयीन बालकाची वेठबिगारीतून सुटका केली. बालकाकडून जबरदस्तीने शेतीची कामे तसेच बकऱ्या सांभाळण्याचे काम करून घेतले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी दोन शेतमालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले आहेत.

मूळचा मध्य प्रदेशातील हरसूद जिल्हा खांडवा येथील हा बालक असून त्याचे वय अंदाजे १३ वर्षे आहे. बालकाचे वडील एका गुन्ह्यात कारागृहात शिक्षा भोगत असल्याची माहिती प्रशासनाच्या चौकशीत समोर आली आहे.बालकाची सावत्र आई संबंधित शेतमालकाकडे राहत होती.या शेतमालकाने बालकाच्या वडिलांना काही रक्कम दिल्याचा दावा केला होता.दरम्यान बालकाच्या आजीने त्याचा ताबा मागितला असता संबंधित शेतमालकाने माझे पूर्ण पैसे मिळाल्याशिवाय बालकाला सोडणार नाही अशी भूमिका घेतल्याचे समोर आले. त्यानंतर बालकाला बेकायदेशीररीत्या आपल्या ताब्यात ठेवून त्याच्याकडून शेतीची कामे करून घेतली जात असल्याचा आरोप आहे.

शेतीकामासह बकऱ्या सांभाळण्याचे काम

चिंचोली येथील शेतामध्ये बालकाकडून जबरदस्तीने शेतीची कामे करून घेतली जात



होती.तसेच त्याच्यावर बकऱ्या सांभाळण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती.या काळात बालकाचा शारीरिक व मानसिक छळ करण्यात आल्याची माहितीही प्रशासनाला मिळाली.

चाइल्ड हेल्पलाइन १०९८ कडून माहिती प्राप्त होताच जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल,पोलीस,कामगार विभाग तसेच महिला व बाल विकास विभागाच्या संरक्षण कक्षाच्या पथकाने संयुक्तपणे कारवाई केली.पथकाने चिंचोली शिवारात जाऊन बालकाची सुटका केली.

सुटका केल्यानंतर बालकाला बाल कल्याण समिती जालना यांच्या आदेशानुसार शासकीय बालगृह जालना येथे दाखल करण्यात आले आहे. बालकाचा सविस्तर जबाब नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून त्याच्या पुनर्वसनासाठी आवश्यक कार्यवाही केली जात आहे.संबंधित विभागांना चौकशीचे आदेश

या प्रकरणात वेठबिगार कामगार पद्धती निर्मूलन अधिनियम १९७६ तसेच बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम २०१५ अंतर्गत कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत. शेतमालकांनी दिलेली कथित अग्रिम रक्कम मजुरी मानधन तसेच बालकाला बेकायदेशीररीत्या कामाला लावल्यासंदर्भातील पुरावे संकलित करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

उपविभागीय पोलीस अधिकारी,भोकरदन यांच्याकडे गुन्ह्याच्या तपासाचे पर्यवेक्षण,आरोपींच्या अटकेसंदर्भातील कार्यवाही जबाब नोंदणी तसेच अँटी ह्युमन ट्रॅफिकिंग युनिटशी समन्वयाची जबाबदारी देण्यात आली आहे. तहसीलदार भोकरदन यांना संबंधित शेतमालकाची ओळख निश्चित करणे सातबारा व अन्य महसूल अभिलेखांची तपासणी आणि स्थळ पाहणी करण्याचे निर्देश आहेत.कामगार विभागाकडून बालकाची मजुरी,थकीत वेतन वसुली तसेच बालकामगार प्रतिबंधक कायद्यानुसार स्वतंत्र कारवाई करण्यात येणार आहे.

बालमजुरी आढळल्यास प्रशासनाला कळवा

जिल्ह्यात कुठेही अल्पवयीन मुलांकडून बालमजुरी वेठबिगारी अथवा बळजबरीने काम करून घेतले जात असल्याचे आढळल्यास नागरिकांनी तातडीने प्रशासनाला माहिती द्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.जिल्हाधिकारी कार्यालय ०२४८२-२२४५०२

चाइल्ड हेल्पलाइन १०९८

बालमजुरी वेठबिगारी आणि बालकांवरील अत्याचार हा गंभीर व दखलपात्र अपराध असून अशा प्रकारांना कोणत्याही परिस्थितीत थारा दिला जाणार नाही. दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल असा इशारा जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिला आहे.

# अंबड तालुक्यात कपाशी सुकली खरिपावर दुष्काळाचे सावट

### पावसाचा प्रदीर्घ खंड सोयाबीन,तूर,मूग,मक्यासह पिके संकटात पंचनामे करून तातडीने मदतीची शेतकऱ्यांची मागणी

जामखेड विलास बा.जाधव

अंबड तालुक्यातील जामखेडसह परिसरात पावसाने प्रदीर्घ उघडीप दिल्याने खरीप हंगाम संकटात सापडला आहे. पावसाअभावी जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत असून कपाशीची पिके सुकण्यास सुरुवात झाली आहे. सोयाबीन,तूर,मूग,मका यांसह अन्य खरीप पिकांवरही पाण्याअभावी संकट ओढवले आहे.आणखी काही दिवस पाऊस न झाल्यास उभा खरीप हंगाम हातातून जाण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

हंगामाच्या सुरुवातीला समाधानकारक पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने पेरणी केली.बियाणे खते कीटकनाशके मशागत आणि मजुरीसाठी मोठा खर्च करून शेतकऱ्यांनी पिके उभी केली.मात्र पिके वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यात असतानाच पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे.

कपाशीची पाने कोमेजली



कपाशीला सध्या पाण्याची मोठी गरज असताना पावसाचा खंड पडल्याने अनेक शेतांमधील जमिनीतील ओलावा कमी झाला आहे. परिणामी कपाशीची पाने कोमेजून झाडे सुकू लागली आहेत.सोयाबीन,तूर,मूग आणि मक्याच्या पिकांवरही त्याचा विपरीत परिणाम होत असून उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पिके वाचविण्यासाठी शेतकरी विहिरी बोअरवेल आणि अन्य उपलब्ध जलस्रोतांच्या माध्यमातून पाणी देण्याचा प्रयत्न करीत आहेत.मात्र अनेक भागांत जलस्रोतांमध्ये पुरेसा पाणीसाठा नसल्याने हा प्रयत्नही अपुरा ठरत आहे. पावसाचा खंड आणखी वाढल्यास ग्रामीण भागात जनावरांच्या चाऱ्याचा तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता आहे.

गावनिहाय पंचनाम्यांची मागणी

अंबड तालुक्यातील सद्यस्थितीची प्रशासनाने तातडीने पाहणी करून गावनिहाय पिकांचे पंचनामे करावेत अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. पावसाचा खंड पिकांची सद्यस्थिती उपलब्ध पाणीसाठा आणि संभाव्य नुकसान यांचा वस्तुनिष्ठ आढावा घेऊन तालुक्यातील परिस्थितीचा अहवाल शासनाकडे पाठवावा. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत पीकविमा भरपाई तसेच जनावरांच्या चाऱ्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात अशी मागणीही जोर धरत आहे.

आता पाऊस झाला नाही तर खरीप हातातून जाईल

मोठ्या आशेने कपाशीची लागवड केली होती. सुरुवातीला पाऊस झाल्याने पीक चांगले येईल अशी अपेक्षा होती.मात्र आता पावसाने मोठा खंड घेतल्याने कपाशी सुकू लागली आहे. आणखी काही दिवस पाऊस झाला नाही तर संपूर्ण खरीप हंगाम हातातून जाण्याची भीती आहे.शासनाने तातडीने पाहणी करून पंचनामे करावेत आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी अशी प्रतिक्रिया जामखेड येथील चिंताग्रस्त शेतकरी बाबुलाल जाधव यांनी व्यक्त केली.

# वृद्ध कलावंत मानधन योजनेत बोगसगिरीचा आरोप

खऱ्या कलावंतांना डावलल्याचा दावा निकषांची काटेकोर अंमलबजावणी करण्याची मागणी

भोकरदन इसरारखान पठाण :- महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या वृद्ध साहित्यिक व कलावंत मानधन योजनेच्या निवड प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. शासनाने निश्चित केलेले निकष डावलून बोगस व अपात्र व्यक्तींची कलावंत म्हणून निवड केली जात असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्त्या सुरेखा पगारे यांनी केला आहे. याबाबत त्यांनी जिल्हाधिकारी जालना यांच्याकडे निवेदन देऊन खऱ्या पात्र आणि गरजू वृद्ध कलावंतांचीच निवड करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, जालना जिल्ह्यातील ७० ते ८० वर्षे वयोगटातील अनेक कलावंत गेल्या २५ वर्षांपासून या मानधन योजनेसाठी अर्ज करीत आहेत. मात्र वारंवार अर्ज करूनही त्यांच्या मानधनाच्या अर्जांना अद्याप मंजुरी मिळालेली नसल्याचे पगारे यांनी म्हटले आहे.

लोककला,शाहिरी,भारूड, कीर्तन,वादन आणि गायनाच्या माध्यमातून आयुष्यभर समाजप्रबोधनाचे कार्य करणारे अनेक ज्येष्ठ कलावंत आजही मानधनापासून वंचित असल्याचा दावा करण्यात आला आहे. कलेची सेवा करूनही या कलावंतांना आजपर्यंत मानधनाचा लाभ मिळालेला नसल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

निकष डावलून निवड झाल्याचा आरोप

सन २०२३ ते २०२५ या कालावधीत शासनाने निश्चित केलेले निकष डावलून बोगस व अपात्र व्यक्तींची कलावंत म्हणून निवड करण्यात आल्याचा आरोप पगारे यांनी केला आहे. पात्र कलावंतांना डावलून अपात्र व्यक्तींना योजनेचा लाभ मिळत असेल, तर ही बाब खऱ्या कलावंतांवर अन्याय करणारी असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.ऑनलाइन अर्जांची काटेकोर छाननी करा

सन २०२५-२६ या वर्षासाठी वृद्ध साहित्यिक व कलावंत मानधन योजनेअंतर्गत अर्ज मागविण्यात आले असून जिल्ह्यातील अनेक गरजू व वयोवृद्ध कलावंतांनी ऑनलाइन पद्धतीने अर्ज दाखल केले आहेत. या पार्श्वभूमीवर यंदाच्या निवड प्रक्रियेत प्रत्येक अर्जाची काटेकोरपणे छाननी करावी अर्जदाराची प्रत्यक्ष कला अनुभव वय आणि शासनाच्या निकषांनुसार पात्रता तपासावी अशी मागणी पगारे यांनी केली आहे.आमरण उपोषणाचा इशारा यावेळीही पात्र व खऱ्या वृद्ध कलावंतांना डावलून अपात्र किंवा बोगस व्यक्तींना मानधनाचा लाभ देण्यात आल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा सुरेखा पगारे यांनी निवेदनातून दिला आहे. त्यामुळे वृद्ध साहित्यिक व कलावंत मानधन योजनेच्या निवड प्रक्रियेकडे आता जिल्ह्यातील कलावंतांचे लक्ष लागले आहे. जिल्हा प्रशासन या आरोपांची चौकशी करून निवड प्रक्रिया पारदर्शक करण्यासाठी कोणती भूमिका घेते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



# वाराणसीत ९ सेंमी एड्रेनल ग्लँडच्या गाठीवर लॅप्रोस्कोपिक शस्त्रक्रिया; किनवटचे सुपुत्र डॉ. सौरभ सिरमनवार यांचा महत्त्वपूर्ण सहभाग

मोठ्या चिराशिवाय गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी; हेरिटेज खचड हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी

किनवट प्रतिनिधी दि.२१ : आधुनिक आणि अत्याधुनिक शल्यचिकित्सेच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी नोंदवत वाराणसी येथील हेरिटेज खचड हॉस्पिटलमध्ये प्रथमच लॅप्रोस्कोपिक राइट एड्रेनलेक्टॉमी (ङररिींलेळिल ठळसहीं - वीशपरश्रशलींू) ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली.

विशेष म्हणजे, या अत्यंत आव्हानात्मक शस्त्रक्रियेत किनवटचे माजी नगरसेवक संजय सिरमनवार व जिल्हा परिषद शिक्षिका स्वाती नेम्मानीवार यांचे सुपुत्र डॉ. सौरभ सिरमनवार यांनी सहायक शल्यचिकित्सक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यामुळे किनवटच्या वैद्यकीय क्षेत्रासाठी ही कामगिरी अभिमानाची बाब ठरली आहे.

रुग्णामध्ये उजव्या बाजूला सुमारे ९ सेंमी आकाराची एड्रेनल ग्रंथीची गाठ आढळून आली होती. ही गाठ शरीरातील अत्यंत महत्त्वाच्या इन्फीरियर वेना कावा तसेच रीनल वेन या रक्तवाहिन्यांना चिकटलेली होती. त्यामुळे शस्त्रक्रिया अत्यंत काळजीपूर्वक आणि अचूक पद्धतीने करणे आवश्यक होते.रुग्णाची सखोल तपासणी, आवश्यक प्री-ऑपरेटिव्ह मूल्यांकन आणि जोखमींचे परीक्षण केल्यानंतर यूरोलॉजी विभागाने मोठा चीरा देऊन करण्यात येणाऱ्या पारंपरिक ओपन सर्जरीऐवजी मिनिमली इनवेसिव्ह लॅप्रोस्कोपिक तंत्राचा अवलंब करण्याचा निर्णय घेतला. या पद्धतीमुळे शस्त्रक्रियेदरम्यान अधिक अचूकता राखणे, रक्तस्राव व शस्त्रक्रियेनंतरचा त्रास कमी करणे तसेच रुग्णाची लवकर पुनर्प्राप्ती होण्यास मदत होते.

ही अत्यंत जटिल शस्त्रक्रिया यूरोलॉजिस्ट डॉ. गौतम शुभंकर यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. त्यांना सहायक शल्यचिकित्सक म्हणून डॉ. सौरभ सिरमनवार यांनी महत्त्वपूर्ण सहकार्य केले. भूलतज्ज्ञ डॉ. नवनीता बिष्ट यांनी भूल व्यवस्थापनाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. संपूर्ण वैद्यकीय टीमच्या उत्कृष्ट समन्वयातून ही शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली.


## कार्यालय नगर परिषद, लोहा जिल्हा नांदेड

अ.क्र. एनपीएलओ/निविदा सूचना/ / २०२६ दि. / / २०२६

## निविदा जाहिर सुचना

सर्व पुरवठादारा दुकानदार याना कळविण्यात येते कि, लोहा नगर परिषद हद्दीमध्ये खालील तक्त्यातील काम करावयाची असल्यामुळे मुख्याधिकारी, नगर परिषद तर्फे ऑफ लाईन पद्धतीने निविदा दरपत्रक मागवित असुन इच्छुकांनी काम करण्यास तयार असल्यास कोरी निविदा फार्म मुख्याधिकारी नगर परिषद, लोहा येथे कार्यालयीन वेळेत दि.२०/०८/२०२६ ते २८/०८/२०२६ या तारखेत ०६.०० वाजता पर्यंत मिळेल. आणि भरेली निविदा दिनांक २०/०८/२०२६ ते दि.२६/०८/२०२६ रोजी रोजी ०६:०० वाजता पर्यंत दाखल करावे. मुदतीनतर आलेल्या निविदा स्वीकारली जाणार नाही. तसेच शक्य झाल्यास त्याच दिवशी निविदा उघडण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | कोरी निवीवदा शुल्क | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत करारनामा करतेवेळेस | कंत्राटदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | नगर परिषद, लोहा कार्यालयीन कामकाजाकरीता विविध आकारमान मध्ये छायांकित प्रति काढून देणे बाबत व इतर अनुषंगिक कामे करणे बाबत | ५००.०० | १०००.०० | २०००.०० | आवश्यक दस्त ऐवज |
| २ | २६ जानेवारी, ०१ मे १५ ऑगस्ट, १७ सपटेंबर चे ध्वज वंदन, सभा कामकाज, महामानवांच्या जयंती व पुण्यतिर्थी ई. सण उत्सव आणि अनुषंगिक कामे करणे बाबत | ५००.०० | ५०००.०० | ५०००.०० | |
| ३ | नगर परिषद, लोहा स्वच्छता विभाग व कार्यालयीन कामकाज करीता साहित्य पुरवठा करणे व इतर अनुषंगिक कामे करणे बाबत | ५००.०० | ५०००.०० | ५०००.०० | |

नोट :- ०१) कोणतीही कारण न देता एक किंवा सर्व निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा तसेच निविदेतील अटी व शर्तीत बदल करण्याचा अधिकार मुख्याधिकारी नगरपरिषद लोहा यांनी राखून ठेवलेला आहे. ०२) कोरी निविदा फार्म टपाली पाठविले जाणार नाही. ०३) निविदाधारकाने लिफाफा क्र. ०१ मध्ये नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, वस्तु व सेवाकर प्रमाणपत्र आणि इसारा रकमेचा धनाकर्ष किंवा रोखीने भरणा केलेली पावती सिलबंद करावे आणि लिफाफा क्र. ०२ मध्ये कोरी निविदा मध्ये दर भरणा करून दोन्ही लिफाफे मोठ्या लिफाफा मध्ये सिलबंद करून विहित मुदती मध्ये कार्यालयात दाखल करावेत. ०४) काम पुर्ण करण्याचा कालावधी कार्यादेश देण्यात आल्यानंतर ३ दिवसांत किंवा कामाच्या अनुषंगाने पूर्ण करणे बंधनकारक राहील. ०५) करारनाम्यात नमुद केल्याप्रमाणे काम सुरु न केल्यास किंवा काम अर्धवट सोडल्यास कंत्राटदाराची बयाणा अनामत रक्कम जप्त केली जाईल व काम दुस-या कंत्राटदार कडून करुन घेण्यात येईल ०६) कंत्राटदारास जीएसटी संदर्भात शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश पाळणे बंधनकारक राहील ०७) सदर कामे करतांना काही अपघात होवून वित्तहानी किंवा जिवितहानी झाल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. ०८) करारनामा मध्ये नमुद केलेल्या मुद्दतीत काम पुर्ण न झाल्यास मुद्दती बाहेर प्रत्येक दिवसास रक्कम रुपये ५०/- प्रमाणे दंड आकारला जाईल. ०९) साहित्य तपासणी अहवाल सादर करणे बंधनकारक राहील.

स्वाक्षरित/-
मुख्याधिकारी नगरपरिषद लोहा


# नांदर; येथील अभय राजेभोसले यांची युथ काँग्रेसच्या तालुकाध्यक्षपदी निवड

पैठण /प्रतिनिधी

नांदर ता पैठण येथील अभय प्रतापराव राजेभोसले वय(२४) यांची नॅशनल स्टुडंट्स ऑफ इंडिया काँग्रेसच्या पैठण तालुकाअध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली. पक्षाचे अध्यक्ष विनोद जाखड यांच्या आदेशानुसार व प्रदेशाध्यक्ष सागर साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाअध्यक्ष अभिषेक शिंदे यांनी ही निवड केली आहे. या निवडीचे खासदार डॉ कल्याण काळे, माजी मंत्री अनिल पटेल, माजी आमदार एम. शेख, जिल्हाध्यक्ष किरण डोणगावकर, जिल्हा उपाध्यक्ष दिलीपराव राजेभोसले, तालुका अध्यक्ष रमेश मूळे, हसोद्दीन कट्टारे, निमेश पटेल, संभाजी काटे, रविंद्र आम्ले, सदानंद खडसन, लतीफ शेख, किशोर दसपुते, शेखर देशमुख,



निखिल काळे, युनूस पठाण, आदींनी अभिनंदन केले आहे.

नांदर ता पैठण येथील अभय प्रतापराव राजेभोसले वय(२४) यांची नॅशनल स्टुडंट्स ऑफ इंडिया काँग्रेसच्या पैठण तालुकाअध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेत गल्हाटी मध्यम प्रकल्पातील गाळ काढण्याची मागणी

## जलसाठा क्षमता वाढविण्यासाठी शेतकरी व शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठानच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन

घुंगर्डे हादगाव/ प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील गल्हाटी मध्यम प्रकल्प हा परिसरातील हजारो शेतकऱ्यांच्या शेतीसाठी जीवनदायी ठरू शकणारा महत्त्वाचा जलस्रोत आहे.मात्र गेल्या अनेक वर्षांपासून जलाशयात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने प्रकल्पाची जलसाठवण क्षमता कमी होत असल्याची बाब समोर आली आहे.त्यामुळे प्रकल्पातील गाळ तातडीने काढून जलसाठा क्षमता वाढवावी,अशी जोरदार मागणीचे निवेदन शेतकरी व शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठानच्यावतीने जालना येथील पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अभियंता एस.एम.शेळके यांना दिले.

यासंदर्भात जिल्हाधिकारी,जालना,कार्यकारी अभियंता,जालना पाटबंधारे विभाग तसेच जिल्हा जलसंधारण अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.या निवेदनात गल्हाटी मध्यम प्रकल्पातील साचलेल्या गाळाचे तातडीने शास्त्रीय पद्धतीने सर्वेक्षण करून त्याचे प्रमाण निश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे.



गल्हाटी मध्यम प्रकल्पाला अनेक दशके पूर्ण झाल्याने जलाशयाच्या तळाशी मोठ्या प्रमाणावर गाळ साचला असण्याची शक्यता आहे.परिणामी पाणीसाठ्याची प्रत्यक्ष क्षमता कमी होऊन उपलब्ध पाण्याचा अपेक्षित सिंचनासाठी पूर्ण क्षमतेने उपयोग होत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.पाणी उपलब्ध असूनही त्याची साठवण क्षमता कमी होणे ही शेतकऱ्यांसाठी गंभीर बाब आहे,अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

त्यामुळे केवळ कागदोपत्री पाहणी न करता जलसंपदा विभागाने प्रत्यक्ष जलाशयाची पाहणी करून गाळाचे शास्त्रीय सर्वेक्षण करावे,गाळाचे नेमके प्रमाण निश्चित करावे आणि त्यानंतर तातडीने गाळ काढण्याचे काम हाती घ्यावे.प्रकल्पातील गाळ काढल्यास जलाशयाची उपलब्ध साठवण क्षमता वाढण्यास मदत होऊन पावसाळ्यात उपलब्ध होणारे पाणी अधिक प्रमाणात साठविता येईल.त्याचा थेट फायदा गल्हाटी मध्यम प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी होऊ शकतो.त्यामुळे गाळ काढण्याचे काम हे केवळ जलाशय स्वच्छ करण्याचे काम नसून भविष्यातील सिंचन सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची उपाययोजना असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित जलसंपदा विभागाला तातडीने स्थळ पाहणी, गाळ सर्वेक्षण व पुढील आवश्यक कार्यवाहीचे निर्देश द्यावेत,अशी मागणी करण्यात आली आहे.या निवेदनावर गल्हाटी संघर्ष समितीचे अध्यक्ष राधाकिसन मैंद, शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा.राजेंद्र छल्लारे,सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण भडांगे,मंगेश मुंढे,गणेश पवार यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शाळेच्या वेळेत बाहेरील व्यक्तींना छायाचित्रणास बंदी ;गटशिक्षणाधिकारी आष्टी यांचे केंद्रप्रमुखांना निर्देश

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) शाळेच्या नियमित वेळेत शाळेच्या आवारात बाहेरील व्यक्तींनी येऊन विविध कारणांसाठी छायाचित्रण अथवा फोटो काढण्यास आता प्रतिबंध करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये तसेच शाळेतील अध्यापन-अध्ययन प्रक्रिया सुरळीतपणे पार पडावी, यासाठी गटशिक्षणाधिकारी आष्टी यांनी तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुखांना याबाबत स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

जिल्हा परिषद, बीड अंतर्गत पंचायत समिती आष्टीच्या गटशिक्षणअधिकारी कार्यालयाकडून दिनांक २० ऑगस्ट २०२६ रोजी आष्टी तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुखांना यासंदर्भात लेखी पत्र देण्यात आले आहे. हे पत्र मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांच्या २० ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या बैठकीतील सूचनेच्या संदर्भाने जारी करण्यात आले आहे.

या पत्रानुसार केंद्रांतर्गत येणाऱ्या सर्व माध्यमांच्या तसेच सर्व व्यवस्थापनांच्या मुख्याध्यापकांना त्यांच्या स्तरावर आवश्यक त्या सूचना देण्याचे निर्देश केंद्रप्रमुखांना देण्यात आले आहेत. शाळा बाह्य व्यक्तींनी शाळेच्या वेळेत शाळेत उपस्थित राहून विविध विषयांबाबत छायाचित्रण अथवा फोटो काढण्यापूर्वी संबंधित मुख्याध्यापकांची परवानगी घेणे आवश्यक राहणार आहे. मात्र, शाळेच्या नियमित वेळेत छायाचित्रण किंवा फोटो काढण्यास मुख्याध्यापकांनी कोणत्याही प्रकारची परवानगी देऊ नये, असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

शाळेच्या वेळेत बाहेरील व्यक्ती अनधिकृतपणे उपस्थित राहिल्यास त्यांच्याशी सौम्य व विनम्र शब्दांत संवाद साधून शाळेच्या वेळेबाहेर उपस्थित राहण्याबाबत कळवावे, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर कोणताही विपरीत परिणाम होऊ नये आणि शैक्षणिक कामकाजात अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी शाळा व्यवस्थापन समिती, सरपंच तसेच शिक्षणप्रेमी नागरिकांचे सहकार्य घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शाळेतील शैक्षणिक कामकाज अबाधितपणे व सुरळीतपणे पार पाडण्याबाबत मुख्याध्यापकांना अवगत करावे, तसेच या संपूर्ण बाबीची केंद्रस्तरावरील जबाबदारी संबंधित केंद्रप्रमुखांची राहील, असेही पत्रात नमूद करण्यात आले आहे.



शाळेचा परिसर हा विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी महत्त्वाचा असून शैक्षणिक वेळेत बाहेरील व्यक्तींच्या अनावश्यक वावरामुळे अध्यापन प्रक्रियेत व्यत्यय येऊ नये, यासाठी प्रशासनाने हे निर्देश दिले आहेत. त्यामुळे आष्टी तालुक्यातील सर्व शाळांनी या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

या पत्राची प्रत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड तसेच मा. शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद बीड यांना माहितीसाठी सादर करण्यात आली आहे. गटशिक्षणाधिकारी यांच्या या सूचनांमुळे शाळेच्या वेळेत होणाऱ्या अनधिकृत छायाचित्रणाला आळा बसून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणाला अधिक सुरक्षितता व शिस्त मिळणार आहे.

# आष्टीत रानभाजी महोत्सव उत्साहात ३० प्रकारच्या रानभाज्यांचे प्रदर्शन

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुका कृषी अधिकारी कार्यालयात कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) व कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि. २० ऑगस्ट रोजी रानभाजी महोत्सव उत्साहात पार पडला. परिसरात सहज उपलब्ध होणाऱ्या पारंपरिक रानभाज्यांचे आकर्षक प्रदर्शन या महोत्सवात भरविण्यात आले होते. ग्रामीण भागातील पारंपरिक आहारसंस्कृतीचे जतन, रानभाज्यांचे संवर्धन तसेच दैनंदिन आहारातील त्यांचा वापर वाढविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवाला शेतकरी, कृषी विभागातील अधिकारी-कर्मचारी, कृषी सखी व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

महोत्सवात तांदुळजा, माठ, आळू, हादगा फुले, करटोली, अंबाडी, गुळवेल, बांबू, पाथरी, कुंजीर, शेवगा, उंबर, कपाळकोडी, भुईआवळा, केना, पानाचा ओवा, आघाडा, पिंपळ, फांद्यांची भाजी, टाकळा, कुरडू, कवठ, चिघळ, शेवग्याची पाने आदींसह तब्बल ३० प्रकारच्या रानभाज्यांचे प्रदर्शन करण्यात आले. अनेक रानभाज्या ग्रामीण भागात सहज उपलब्ध असून पूर्वीपासूनच स्थानिक आहाराचा त्या महत्त्वाचा भाग राहिल्या आहेत. मात्र बदलत्या जीवनशैलीमुळे पारंपरिक रानभाज्यांचा आहारातील वापर कमी होत असल्याने त्यांच्या महत्त्वाची नव्याने ओळख करून देण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.



रानभाज्यांमध्ये विविध पोषक घटक व औषधी गुणधर्म आढळतात. त्यामुळे आरोग्यदायी आहाराच्या दृष्टीने त्यांचे महत्त्व मोठे आहे. काही रानभाज्यांचा पारंपरिक पद्धतीने विविध आरोग्यविषयक समस्यांमध्ये उपयोग केला जातो. महोत्सवाच्या निमित्ताने रानभाज्यांची ओळख, त्यातील पौष्टिक घटक, पारंपरिक व औषधी उपयोग, आहारातील महत्त्व तसेच त्यांचे संगोपन व संवर्धन याबाबत उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या या नैसर्गिक संपदेचे जतन करण्याबरोबरच पुढील पिढ्यांपर्यंत पारंपरिक ज्ञान पोहोचविण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली.

रानभाज्यांचे संवर्धन हे केवळ आहाराच्या दृष्टीनेच नव्हे, तर स्थानिक जैवविविधता टिकविण्यासाठीही महत्त्वाचे आहे. नैसर्गिकरीत्या उपलब्ध होणाऱ्या विविध वनस्पतींची ओळख, त्यांचा योग्य वापर आणि संगोपन याबाबत शेतकरी व ग्रामीण नागरिकांमध्ये जागृती निर्माण होणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर कृषी विभाग आणि आत्माच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या रानभाजी महोत्सवातून पारंपरिक आहारपद्धती, नैसर्गिक साधनसंपत्ती आणि आरोग्यदायी जीवनशैली यांचा परस्पर संबंध अधोरेखित करण्यात आला.

कार्यक्रमास विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील तंत्र अधिकारी, फलोत्पादन विभागाचे कानिफनाथ मरकड, कृषी अधिकारी गोरख तरटे, कृषी अधिकारी गोकुळ जाधव व राजेश पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच मंडळ कृषी अधिकारी खुटाळे, भापकर, सूर्यवंशी, जगदने, उपकृषी अधिकारी महेश बोरुडे, प्रशांत धस, आठरे, धनवडे, चव्हाण, आत्माचे बेग एम. आर. व राजेंद्र धोंडे यांच्यासह कृषी विभागातील सहाय्यक कृषी अधिकारी, नैसर्गिक शेती अभियानातील कृषी सखी, विविध शेतकरी गटांचे प्रतिनिधी आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. रानभाज्यांचे महत्त्व, त्यांचे संवर्धन आणि आहारातील वापर याबाबत जनजागृती करणारा हा उपक्रम आष्टी परिसरातील शेतकरी व नागरिकांसाठी माहितीपूर्ण व उपयुक्त ठरला.

# पारगाव जोगेश्वरीत ‘लेक वाचवा’ चा अनोखा संदेश

## कन्यारत्न जन्माला आल्यास सावळेराम बळे देणार ११०० रुपयांची भेट

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील पारगाव जोगेश्वरी येथे कन्यारत्नाच्या जन्माचे स्वागत करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते सावळेराम बळे यांनी अनोखा आणि स्तुत्य उपक्रम जाहीर केला आहे. गावात जन्माला येणाऱ्या प्रत्येक कन्येच्या पालकांना १ हजार १०० रुपयांची भेट देऊन कन्यारत्नाचे स्वागत करण्यात येणार आहे. समाजातील स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासोबतच मुलीच्या जन्माकडे सकारात्मक आणि आनंदाच्या दृष्टीने पाहण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात येत असून, सावळेराम बळे यांच्या या सामाजिक उपक्रमाचे पंचक्रोशीतून कौतुक होत आहे.

पारगाव जोगेश्वरी येथील महादेव मंदिरात सालाबादप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात झाली. सांगता कीर्तनानंतर झालेल्या कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते सावळेराम बळे यांनी हा महत्त्वपूर्ण उपक्रम जाहीर केला. मुलगा आणि मुलगी यांच्यात कोणताही भेदभाव न करता मुलींच्या जन्माचे मनापासून स्वागत व्हावे, समाजात कन्यारत्नाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण व्हावे आणि स्त्रीभ्रूणहत्येसारख्या गंभीर सामाजिक समस्येविरुद्ध



जनजागृती व्हावी, या उद्देशाने हा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

या उपक्रमाची सुरुवातही प्रत्यक्ष कृतीतून करण्यात आली. गावातील मृदगाचार्य ह. भ. प. महेश महाराज बळे-भोसले यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच त्यांच्या घरी नुकत्याच कन्यारत्नाचा जन्म झाल्याच्या आनंदानिमित्त सावळेराम बळे यांनी १ हजार १०० रुपयांची भेट देऊन कन्येचे स्वागत केले. त्यामुळे या उपक्रमाचा पहिला मान महेश महाराज बळे-भोसले यांच्या कुटुंबाला मिळाला. कन्येच्या जन्माचा आनंद संपूर्ण समाजाने साजरा करावा, तिच्या शिक्षणाला व भविष्यातील वाटचालीला प्रोत्साहन मिळावे, या व्यापक सामाजिक भावनेतून हा उपक्रम पुढेही सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत मुलींना समान संधी देणे, त्यांच्या जन्माचे स्वागत करणे आणि त्यांच्याविषयी समाजात सकारात्मक विचार रुजविणे अत्यंत गरजेचे आहे. अशा परिस्थितीत पारगाव जोगेश्वरीसारख्या ग्रामीण भागातून कन्यारत्नाच्या जन्मानिमित्त आर्थिक भेट देऊन तिचे स्वागत करण्याचा उपक्रम सुरू होणे ही निश्चितच उल्लेखनीय बाब आहे. केवळ आर्थिक मदत न देता मुलगी जन्माला येणे ही आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात येत आहे. या उपक्रमामुळे गावातील इतर कुटुंबांनाही प्रेरणा मिळेल आणि कन्यारत्नाच्या जन्माचे उत्साहाने स्वागत करण्याची सकारात्मक परंपरा निर्माण होईल, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

या कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, भीमराव गुरव, शरद रेडेकर, सचिन रानडे, संतोष सानप, माजी पंचायत समिती सदस्य तोळाबाई शिरोळे, सीताराम बळे, बापूराव मोकाशी, सावळेराम बळे, आबा, अश्रू महाराज मोकाशे, किशोर महाराज, अमोल महाराज, शरद मोकाशी, पांडुरंग बळे, शिवाजी बळे, बापूराव गुरव, रावसाहेब कदम, अर्जुन बोराडे, रामभाऊ बोराडे, श्रीराम बळे, दिगंबर भोपळे, पांडू बळे, महेश बळे, हर्षदा बळे, भक्ती बळे, बळीराम बळे, कागळे महाराज, बाळू शिरोळे, बाबासाहेब कदम, रामदास बोराडे यांच्यासह ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सावळेराम बळे यांनी घेतलेल्या या निर्णयाचे उपस्थितांनी स्वागत करून, कन्यारत्नाच्या जन्माचे स्वागत करण्याच्या या उपक्रमामुळे समाजात मुलींबाबत अधिक सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला.

# पाटोद्यात आज शिक्षणमहर्षी माजी आ.भीमराव धोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षणाचा नवा अध्याय

## आनंदराव धोंडे शैक्षणिक संकुलात नूतन इमारतीचे उद्घाटन आणि शैक्षणिक सहविचार सभा

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) पाटोदा येथील आनंदराव धोंडे शैक्षणिक संकुलात नूतन इमारतीचे उद्घाटन तसेच कर्मचारी शैक्षणिक सहविचार सभा-२०२६चे आयोजन आज, शनिवार, २२ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे. शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, आष्टी, आनंद चॅरिटेबल संस्था, आष्टी, किसान शिक्षण संस्था, आष्टी आणि छत्रपती शाहू एज्युकेशन सोसायटी, आष्टी यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, महाराष्ट्र भूषण तथा माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडणार आहे. पर्यावरण मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांच्यासह राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

शिक्षण क्षेत्रात झपाट्याने होत असलेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व आधुनिक शिक्षण देण्यासाठी संस्थांनी कोणत्या पद्धतीने वाटचाल करावी, यावर या सहविचार सभेत मंथन होणार आहे. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजना, आधुनिक शैक्षणिक पद्धती व तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारे उपक्रम, शैक्षणिक गुणवत्तेचे सातत्याने मूल्यमापन तसेच संस्थेच्या आगामी शैक्षणिक वाटचालीचे नियोजन या विविध विषयांवर सभेत विचारविनिमय होणार आहे.

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, आष्टी तसेच भगिनी संस्थांचे संस्थापक अध्यक्ष महाराष्ट्र भूषण भीमराव धोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध शैक्षणिक उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देणे, शिक्षण संस्थांच्या पायाभूत सुविधांमध्ये वाढ करणे




आणि बदलत्या काळाच्या गरजांनुसार विद्यार्थ्यांना सक्षम बनविणे, या उद्देशाने संस्थेची वाटचाल सुरू आहे. याच शैक्षणिक वाटचालीचा एक भाग म्हणून आनंदराव धोंडे शैक्षणिक संकुलातील नूतन इमारतीचे उद्घाटन आणि कर्मचारी शैक्षणिक सहविचार सभा एकाच वेळी आयोजित करण्यात आली आहे.

या कार्यक्रमास पर्यावरण मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे, माजी आमदार जयदत्त सोनाजीराव क्षीरसागर, माजी मंत्री पंडितराव नारायण दौंड, माजी आमदार सिराजोद्दीन सफदरअली देशमुख, माजी आमदार राधाकृष्ण साहेबराव पाटील, माजी आमदार संगीता विजयप्रकाश ठोंबरे, माजी आमदार नारायणराव मुंडे, माजी मंत्री शिवाजीराव अंकुशराव पंडित, आमदार धनंजय पंडितराव मुंडे, माजी मंत्री प्रा. सुरेश निवृत्ती नवले, माजी मंत्री अशोकराव शंकरराव पाटील, माजी आमदार राजेंद्र साहेबराव जगताप, माजी आमदार लक्ष्मण माधवराव पवार आणि माजी आमदार मोहनराव दिगंबराव सोळंके यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच दमयंती भीमराव धोंडे, महेश सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. अजय धोंडे आणि अभय धोंडे यांचीही उपस्थिती राहणार आहे.

नूतन इमारतीचे उद्घाटन हा कार्यक्रमाचा महत्त्वाचा भाग असून, त्यानंतर कर्मचारी शैक्षणिक सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेतील शिक्षक व कर्मचारी, पदाधिकारी, शैक्षणिक क्षेत्राशी संबंधित व्यक्ती तसेच निमंत्रित मान्यवर या सभेत सहभागी होणार आहेत. बदलत्या शैक्षणिक प्रवाहानुसार शिक्षण संस्थांनी आपल्या कार्यपद्धतीत कोणते बदल करावेत, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी कोणत्या नव्या संकल्पना राबवाव्यात आणि भविष्यातील शैक्षणिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी कोणते नियोजन आवश्यक आहे, यावर उपस्थितांकडून सूचना व विचार मांडले जाणार आहेत.

विद्यार्थ्यांचा केवळ शैक्षणिक विकास न करता त्यांच्यात कौशल्य, सर्जनशीलता, आत्मविश्वास, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी शिक्षण संस्थांची भूमिका महत्त्वाची आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा शिक्षणामध्ये प्रभावी वापर, गुणवत्तेचे मूल्यमापन आणि विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार अध्यापन पद्धती विकसित करण्यावरही या सहविचार सभेत भर दिला जाण्याची अपेक्षा आहे. शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या अनुभवांची देवाणघेवाण तसेच शिक्षण क्षेत्रातील नव्या संकल्पनांवर होणारे मंथन संस्थेच्या आगामी शैक्षणिक धोरणासाठी उपयुक्त ठरणार आहे.

नूतन इमारतीमुळे शैक्षणिक सुविधांना अधिक बळकटी मिळण्यास मदत होणार असून, सहविचार सभेतून संस्थेच्या भविष्यातील शैक्षणिक उपक्रमांना नवी दिशा मिळण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे हा कार्यक्रम केवळ इमारतीच्या उद्घाटनापुरता मर्यादित न राहता संस्थेच्या शैक्षणिक विकासाच्या पुढील टप्प्याचा प्रारंभ ठरणार आहे.

# बायोस्टॅड इंडिया लिमिटेड मुंबई कंपनी तर्फे बायोझाईम प्रगती शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात आले

नायगाव प्रतिनिधी

नायगाव तालुक्यातील येथील जवाहरलाल नेहरू माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय बरबडा येथे बायोस्टॅड इंडिया लिमिटेड मुंबई या कंपनीतर्फे बायोझाईम प्रगती शिष्यवृत्ती वितरण करण्यात आली बायोस्टॅड इंडिया लिमिटेड कंपनी भारतातील कृषी क्षेत्रातील अग्रगणे कंपनी आहे गेल्या ४० वर्षापासून गुणवत्तापूर्ण दर्जेदार कृषी उत्पादने बाजारात देते. बायोस्टॅड इंडिया लिमिटेड कंपनी प्रत्येक जिल्ह्यातील दोन शाळा निवडुन त्या शाळेतील गरीब शेतकरी कुटुंबातील अभ्यासू होतकरू १० विद्यार्थी निवडून प्रत्येकी विद्यार्थ्यांना तीन हजार रुपये शिष्यवृत्ती दर वर्षी वाटप करते. नांदेड जिल्हातील नायगाव तालुक्यातील बरबडा येथील जवाहरलाल नेहरू माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय बरबडा शाळेतील इयत्ता दहावी वर्गातील खालील दहा विद्यार्थी, सुपारे साक्षी शिवाजी, अनिकेत बालाजी मुंडकर, शेख सुहाना अहमद, शिवम शिवराज कुंभारगावे, वसुधा खंडू मुंडफळे, श्रुती बाबू शिंगेवाड, दुर्गा तुकाराम सदापतनवार, रोशनी माधवराव शिंदे, नागेश मालु सुरणे, काजल साहेबराव पवार, सदरील विद्यार्थ्यांना शिष्यवृती



व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उप मुख्याध्यापक गणेश बडूरे सर. आणि नांदेड येथील गोदावरी कृषी केंद्राचे संचालक अर्जुन दमकोंडवार, कृषिरत्न हायटेक नर्सरी घुंगराळा संचालक शीतल पाटील, संत कृपा कृषी सेवा केंद्र बरबडा संचालक गोपाल आलेवाड, शिवशक्ती कृषी सेवा केंद्र बरबडा संचालक शंकर शिंदे, बायोस्टॅड इंडिया लिमिटेड कंपनीचे, टेरीटरी मैनेजर विजयकुमार जोरूळे, डेवलपमेंट ऑफिसर किशोर ठाकरे, उमरी नानाराव खांडरे, अर्धापूर संभाजी गोरे, आदींची उपस्थिती होती हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थ्यांनी सहकार्य केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संभाजी गोरे यांनी केले.




# बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी पुढे यावे; भाऊ म्हणून मी सोबत - आ. भीमराव केराम

किनवट प्रतिनिधी दि.२१ : महिला आर्थिक विकास महामंडळाच्या ‘नवतेजस्विनी’ योजनेअंतर्गत प्रगती लोकसंचालित साधन केंद्र, किनवटची तेरावी वार्षिक सर्वसाधारण सभा गजानन महाराज मंगल कार्यालय येथे उत्साहात संपन्न झाली. सभेचे उद्घाटन आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते झाले. यावेळी बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी पुढे यावे, भाऊ म्हणून मी आपल्या सोबत आहे, अशी ग्वाही आ. केराम यांनी दिली. तसेच प्रगती लोकसंचालित साधन केंद्रासाठी जागा व निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. कार्यक्रमाला नगराध्यक्ष सौ. सुजाताताई येंड्रलवार, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, नगरसेवक प्रशांत कोरडे, रोहन राव, मा.वि.म. चे जिल्हा समन्वयक आनंद खेत्रे, नगरसेवक प्रशांत कोर्डे, स्वीय सहाय्यक नीलकंठ कातले यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सुकेशनी कपाटे, कमळताई देशमुख, विशाल श्रोते (तालुका समन्वयक, माविम), अझहर सिद्धीकी (लेखापाल), सहयोगिनी भारती झलके, भाग्यशली भगत, शिंदू लिंबेकर, रविता कार्लेवर, प्रतिभा पाटील, प्रभावती शेंडे यांच्यासह महिला बचतगटांच्या पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांना उद्योग, स्वयंरोजगार व आर्थिक स्वावलंबनाच्या माध्यमातून सक्षम करण्यासाठी नवतेजस्विनी योजनेच्या विविध उपक्रमांचा यावेळी आढावा घेण्यात आला. महिलांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणाचा संकल्प व्यक्त करत सभा उत्साहात संपन्न झाली.

# आ.सुरेश धस यांच्या माध्यमातून ३ लाख ६० हजार रुपयांची मदत मंजूर

## आष्टीसह अहिल्यानगर व इतर भागातील गरजू रुग्णांनाही मदतीचा हात

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे अनेक गरजू रुग्णांना महागडे वैद्यकीय उपचार घेणे कठीण जाते. अशा रुग्णांना आर्थिक मदतीचा आधार मिळावा आणि पैशांअभावी कोणाचाही उपचार थांबू नये, यासाठी लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री सहायता निधीतून सातत्याने मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा केला जात आहे. याच पाठपुराव्याला पुन्हा एकदा यश आले असून, चार गरजू रुग्णाच्या वैद्यकीय उपचारांसाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून एकूण ३ लाख ६० हजार रुपयांची आर्थिक मदत मंजूर झाली आहे.

यामध्ये शितल राजू म्हस्के, रा. कोरेगाव चिखली (वाळकी), जि. अहिल्यानगर यांच्या वैद्यकीय उपचारांसाठी ८० हजार रुपये, तर प्रकाश थोरे, रा. तिंतरवणी, ता. शिरूर कासार यांच्या उपचारांसाठी ८० हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तसेच शंकर कुसळकर, रा. कडा, ता. आष्टी यांच्या उपचारांसाठी ५० हजार रुपये आणि पंकज बोडखे, रा. आनंदवाडी, ता. आष्टी यांच्या वैद्यकीय उपचारांसाठी ५० हजार रुपये मुख्यमंत्री सहायता निधीतून मंजूर झाले आहेत. या आर्थिक मदतीमुळे संबंधित रुग्णांच्या कुटुंबीयांना उपचाराचा खर्च भागविण्यासाठी मोठा दिलासा मिळणार आहे.



दरम्यान, प्रकाश थोरे यांच्या मदतीच्या प्रस्तावासमोर कागदपत्रांमधील तफावतीमुळे अडचण निर्माण झाली होती. त्यांच्या आधारकार्डवर आडनाव 'थोरे', तर रेशनकार्डवर 'थोरवे' अशी नोंद असल्याने मुख्यमंत्री सहायता निधीच्या प्रस्तावाच्या प्रक्रियेत अडथळा आला होता. मात्र हे प्रकरण तहसील कार्यालयाकडे पाठवून संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्यात आला. आवश्यक त्या बाबींची पूर्तता करून प्रस्तावातील अडचण दूर करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. अखेर कागदपत्रांतील तफावत दूर झाल्यानंतर प्रकाश थोरे यांच्या उपचारांसाठी ८० हजार रुपयांची मदत मंजूर करून घेण्यात यश आले. त्यामुळे केवळ मदत मिळवून देण्यापुरतेच नव्हे, तर प्रस्तावाच्या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठीही पाठपुरावा केला जात असल्याचे या प्रकरणातून दिसून आले.

आ. सुरेश धस यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत मिळवून देताना केवळ आष्टी विधानसभा मतदारसंघातील रुग्णांपुरते प्रयत्न मर्यादित ठेवले जात नसून, बाहेरील जिल्ह्यातील गरजू रुग्णांनाही मदतीचा हात दिला जात आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील शितल राजू म्हस्के यांच्या उपचारांसाठीही मुख्यमंत्री सहायता निधीतून ८० हजार रुपयांची मदत मंजूर झाली आहे. रुग्ण कोणत्या गावातील किंवा कोणत्या जिल्ह्यातील आहे, यापेक्षा त्याला उपचारासाठी आर्थिक मदतीची गरज आहे का, याला प्राधान्य देऊन मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जात असल्याचे या माध्यमातून स्पष्ट होत आहे.

यापूर्वीही आ. सुरेश धस यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री सहायता निधीतून अनेक गरजू रुग्णांना आर्थिक मदत मिळवून देण्यात आली आहे. अलीकडेच जनाबाई पांडुळे यांना ८० हजार रुपये, ज्ञानदेव गणगे यांना ५० हजार रुपये आणि अशोक जायभाय यांना ४० हजार रुपये, अशी एकूण १ लाख ७० हजार रुपयांची मदत मंजूर झाली होती. त्यानंतर आता आणखी चार रुग्णांसाठी ३ लाख ६० हजार रुपयांची मदत मंजूर झाली आहे. त्यामुळे आर्थिक अडचणींमुळे उपचारासाठी संघर्ष करणाऱ्या या कुटुंबांना मोठा आधार मिळाला आहे.

वैद्यकीय उपचारांचा खर्च दिवसेंदिवस वाढत असून, गंभीर आजार किंवा मोठ्या शस्त्रक्रियेच्या प्रसंगी सर्वसामान्य कुटुंबांवर मोठा आर्थिक बोजा पडतो. अशा परिस्थितीत मुख्यमंत्री सहायता निधीतून मिळणारी मदत रुग्णांच्या कुटुंबीयांसाठी महत्त्वपूर्ण आधार ठरत आहे. गरजू रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, पैशांअभावी त्यांच्यावर उपचार रखडू नयेत आणि आर्थिक संकटात सापडलेल्या कुटुंबांना दिलासा मिळावा, या उद्देशाने आ. सुरेश धस यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री सहायता निधीसाठी सुरू असलेला पाठपुरावा सातत्याने सुरू आहे. या प्रयत्नांमुळे आष्टीसह परिसरातील तसेच बाहेरील जिल्ह्यातील अनेक गरजू रुग्णांना उपचारासाठी आर्थिक मदतीचा आधार मिळत आहे.

# भारतीय ज्ञान परंपरा कीर्तनामुळे तळागाळापर्यंत पोहोचली

## वेदांतील ज्ञानावर विपुल संशोधनाची गरज भारतीय ज्ञान परंपरा व समृद्ध कीर्तन परंपरा चर्चासत्रात डॉ.न.ब. कदम यांचे प्रतिपादन

घुंगर्डे हादगाव प्रतिनिधी :-
भारताला ज्ञानाची समृद्ध आणि प्रदीर्घ परंपरा लाभली असून वेदादी ग्रंथांमध्ये जीवन समृद्ध करण्यासाठी आवश्यक असलेले विविध ज्ञान मांडले आहे. या ज्ञानावर आजच्या काळात विपुल संशोधन होणे गरजेचे आहे. वैदिक ज्ञान संत परंपरेतील साहित्यात उतरले आणि कीर्तनकारांनी हे ज्ञान तळागाळातील समाजापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. आजही ही परंपरा पुढे नेण्याची गरज आहे असे प्रतिपादन डॉ.न.ब.कदम यांनी केले.श्रीमती दानकुवर हिंदी कन्या विद्यालयाच्या वतीने भारतीय ज्ञान परंपरा व समृद्ध कीर्तन परंपरा या विषयावर एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी बीजभाषण करताना डॉ.कदम बोलत होते.ते पुढे म्हणाले की भारत या शब्दातील भा म्हणजे ज्ञानप्रभा आणि रत म्हणजे रममाण होणे. ज्ञानात सातत्याने रममाण होणारा देश म्हणजे भारत. भारतीय संस्कृतीत ज्ञानाला सर्वोच्च स्थान असून ही ज्ञानपरंपरा संत साहित्य आणि कीर्तनाच्या माध्यमातून सामान्य जनतेपर्यंत पोहोचली आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ.अश्विन रांजणीकर होते.आनंदगड येथील हभप डॉ.भगवान बाबा यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन झाले.यावेळी श्रीमती दानकुवर हिंदी कन्या विद्यालय समितीचे अध्यक्ष महेंद्रकुमारजी गुप्ता, सहसचिव नरेशजी अग्रवाल, कोषाध्यक्ष संजयजी अग्रवाल, संचालक अजयजी अग्रवाल, प्रशासकीय अधिकारी डॉ. विद्या पटवारी तसेच प्रभारी प्राचार्य डॉ. जितेंद्र अहिरराव यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. जितेंद्र अहिरराव यांनी केले. सूत्रसंचालन हभप झगरे गुरूजी वाकदकर यांनी केले, तर आभार डॉ. वासुदेव उगले यांनी मानले.

सोनवणे गुरुजींचा सत्कार

आषाढी एकादशीनिमित्त जालना जिल्ह्यातून दरवर्षी हभप सोनवणे गुरुजी यांच्या नेतृत्वाखाली पंढरपूरकडे शिस्तबद्ध वारी निघते. यंदा शासनाने या दिंडीची दखल घेत स्वच्छतेची उत्कृष्ट दिंडी म्हणून द्वितीय पारितोषिक देऊन गौरव केला. हा जालना जिल्ह्यासाठी



अभिमानाचा क्षण असल्याचे सांगत चर्चासत्रात हभप सोनवणे गुरुजी यांचा हभप डॉ. भगवान बाबा आनंदगडकर यांच्या हस्ते भव्य सत्कार करण्यात आला.

कीर्तन परंपरेत बदलाची गरज

दुपारच्या सत्रात कीर्तन परंपरा वर्तमान काळातील प्रभाव उपयुक्तता व बदलते स्वरूप या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. हभप डॉ. अनिरुद्ध महाराज क्षीरसागर हे अध्यक्षस्थानी होते. सर्वोच्च उपनिषदांतील तत्त्वज्ञान संत साहित्यात आले असून कीर्तनकारांनी संत साहित्याबरोबरच मूळ ग्रंथांचा सखोल अभ्यास करून कीर्तन सादर करणे आवश्यक आहे असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# परतूर एसटी आगारात कारभार की अराजक

## डेपो मॅनेजरसह संबंधित अधिकाऱ्यांच्या निलंबनाची मनसेची मागणी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

परतूर पिराजी गायकवाड :- परतूर एसटी आगारातील कथित अनागोंदी कारभार कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन बस दुरुस्ती-देखभालीतील कथित आर्थिक अनियमितता आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेकडे होत असलेल्या दुर्लक्षाच्या तक्रारींनी आता गंभीर वळण घेतले आहे. आगार व्यवस्थापनाच्या कार्यपद्धतीची स्वतंत्र चौकशी करून डेपो मॅनेजर माधुरी देशमुख यांची तात्काळ बदली करून निलंबनाची कारवाई करावी अशी आक्रमक मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांनी केली आहे.

या संदर्भात २१ ऑगस्ट २०२६ रोजी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सचिवांकडे ई-मेलद्वारे निवेदन पाठविण्यात आले आहे. परतूर आगारातील नियोजनाचा अभाव दैनंदिन कामकाजातील कथित अनियमितता आणि कर्मचाऱ्यांशी अरेरावीची भाषा वापरली जात असल्याच्या तक्रारींची तातडीने दखल घेण्याची मागणी मनसेने केली आहे.

कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास चौकशीची मागणी

डेपो मॅनेजर यांच्याकडून कर्मचाऱ्यांशी दादागिरीच्या भाषेत बोलले जात असल्याच्या योग्य नियोजन केले जात नसल्याच्या तसेच कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास दिला जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. तसेच श्रीमती शेवाळे यांच्या कार्यपद्धतीबाबतही तक्रारी असल्याने दोन्ही महिला अधिकारी-कर्मचाऱ्यांची स्वतंत्र चौकशी करावी आणि आरोपांमध्ये तथ्य आढळल्यास नियमानुसार कठोर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

बस दुरुस्तीच्या नावाखाली बिलांचा खेळ

परतूर आगारातील बस दुरुस्ती व देखभालीच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता होत असल्याच्या तक्रारीही मनसेने केल्या आहेत. आवश्यक दुरुस्ती अथवा देखभाल न करता त्याबाबतची बिले काढली जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.



मागील कालावधीतील बस दुरुस्ती देखभाल स्पेअर पार्ट्स खरेदी आणि संबंधित बिलांचे स्वतंत्र लेखापरीक्षण करून सखोल चौकशी करावी अशी मागणी सोळंके यांनी केली आहे. त्यामुळे एसटी महामंडळ या आरोपांची चौकशी करणार का असा सवाल उपस्थित झाला आहे.

आगारात अस्वच्छता प्रवाशांना मूलभूत सुविधांचा विसर परतूर आगार व बसस्थानक परिसरातील अस्वच्छता दुर्गंधी आणि स्वच्छतेचा अभाव याबाबतही तक्रारी करण्यात आल्या आहेत.प्रवाशांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही आगार व्यवस्थापनाची जबाबदारी असताना त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप मनसेने केला आहे.

एका बसमध्ये तब्बल १३२ विद्यार्थी सुरक्षेचे काय

सर्वाधिक गंभीर प्रश्न विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा असल्याचे सोळंके यांनी म्हटले आहे.विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी असलेल्या सवलतीचा योग्य लाभ मिळत नसल्याच्या तक्रारी असून मनसेच्या वतीने प्रत्यक्ष पाहणी केली असता एका बसमध्ये तब्बल १३२ विद्यार्थी-मुली प्रवास करत असल्याचे आढळून आले असा दावा करण्यात आला आहे.एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना एकाच बसमध्ये प्रवास करावा लागत असेल तर त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी कोणाची अतिरिक्त बसची व्यवस्था का करण्यात आली नाही वेळापत्रकाचे नियोजन का झाले नाही? असे सवाल आता उपस्थित होत आहेत.विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेऊन संबंधित मार्गावर अतिरिक्त बस उपलब्ध करून द्याव्यात वेळापत्रकाचे पुनर्नियोजन करावे आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे अशी मागणी मनसेने केली आहे.सर्व मार्गांचे ऑडिट करा परतूर आगाराअंतर्गत सुरू असलेल्या सर्व एसटी मार्गांचा परिवहन विभागाने प्रत्यक्ष आढावा घ्यावा. प्रत्येक मार्गावरील प्रवासी संख्या विद्यार्थी संख्या उपलब्ध बस फेऱ्या आणि वेळापत्रक यांचे परीक्षण करून आवश्यक त्या ठिकाणी अतिरिक्त बस उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ होऊ नये आगाराचा कारभार पारदर्शक असावा आणि प्रवाशांना योग्य सुविधा मिळाव्यात यासाठी प्रशासनाने केवळ कागदी चौकशी न करता प्रत्यक्ष कारवाई करावी अशी भूमिका मनसेने घेतली आहे.परतूर आगाराचा कारभार योग्य पद्धतीने हाताळण्यात अपयश येत असल्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेऊन माधुरी देशमुख यांची तात्काळ बदली करावी तसेच श्रीमती शेवाळे यांच्या कार्यपद्धतीची चौकशी करावी. आरोपांमध्ये तथ्य आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी अशी मागणी सोळंके यांनी केली आहे.या संपूर्ण प्रकरणाची तक्रार परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि एसटी महामंडळाच्या सचिवांकडे ई-मेलद्वारे करण्यात आली असून प्रशासनाने या तक्रारीवर काय कारवाई केली याची लेखी माहिती महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला द्यावी

# श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या बी.फार्मसी महाविद्यालयात वृक्षारोपण राष्ट्रीय सेवा ; योजना विभागाचा प्रेरक उपक्रम

अंबाजोगाई (प्रतिनिधी)
येथील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित बी.फार्मसी महाविद्यालय, अंबाजोगाई येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण, पर्यावरणपूरक आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. या उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, विद्यार्थी, प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमाची सुरूवात राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.मंदार चौधरी यांच्या स्वागतपर मनोगताने झाली. त्यांनी उपस्थित मान्यवर, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी आणि राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांचे स्वागत करून वृक्षांचे पर्यावरणीय महत्त्व अधोरेखित केले. सदरील उपक्रमाचे श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी व व्यवस्थापकीय संचालक संकेत मोदी यांनी कौतुक केले आहे. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संतोष तरके यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. वृक्ष हे मानवी जीवन, पर्यावरणाचा समतोल आणि जैवविविधतेसाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट करीत त्यांनी, आज लावलेले एक झाड उद्याच्या पिढीला निरोगी आणि सुरक्षित भविष्य देऊ शकते, असा संदेश दिला. वृक्षारोपणाबरोबरच लावलेल्या रोपांची नियमित निगा व संवर्धन करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ झाली. वृक्षारोपण उपक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व विद्यार्थ्यांना विविध गटांमध्ये विभागून महाविद्यालय परिसरातील योग्य ठिकाणी विविध स्थानिक व पर्यावरणपूरक वृक्षांच्या रोपांची लागवड करण्यात आली. स्वयंसेवकांनी खड्डे तयार करून त्यात ५१ रोपे लावली, त्यांना पाणी दिले तसेच रोपांच्या संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजना केल्या. लावलेल्या प्रत्येक रोपाची नियमित निगा राखण्याचा



संकल्प विद्यार्थ्यांनी केला. या उपक्रमामुळे महाविद्यालय परिसर अधिक हिरवागार, सुंदर आणि पर्यावरणपूरक करण्यास चालना मिळाली. कार्यक्रमाच्या शेवटी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच स्थानिक नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. सर्वांच्या सहकार्यामुळे वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला. हा वृक्षारोपण कार्यक्रम अत्यंत यशस्वी, प्रेरणादायी आणि पर्यावरणपूरक ठरला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव, संघभावना, सामाजिक बांधिलकी तसेच वृक्षांच्या संगोपनाची जबाबदारी निर्माण झाली. विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागामुळे महाविद्यालय परिसर अधिक हिरवागार व सुंदर करण्याच्या प्रयत्नांना नवी दिशा मिळाली. या उपक्रमातून वृक्षारोपण ही केवळ पर्यावरणाची गरज नसून भावी पिढीच्या सुरक्षित भविष्यासाठीची सामूहिक जबाबदारी आहे,

# स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात आरोग्यविषयक जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)
येथील यो. शि. संस्थेच्या स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात रेड रिबीन क्लब, राष्ट्रीय सेवा योजना व अंतर्गत गुणवत्ता हमी मंडळाच्या वतीने आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने आरोग्य विषयक जनजागृती पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्वामी रामानंद तीर्थ शा. ग्रा. वै. महाविद्यालयातील समुपदेशक धनराज पवार यांनी एड्स नियंत्रण व एड्स जनजागृती पर मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एड्सचा धोका ओळखून कोणत्याही मोहाला , व्यसनाला बळी न पडता संयमीत जीवन जगुन उज्ज्वल भविष्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. प्रशांत देशमुख यांनी भुषविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेड रिबीन क्लबचे समन्वयक तथा रा. से. यो.



कार्यक्रमाधिकारी डॉ. निलेश होदलूरकर यांनी केले.या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ .रमेश सोनटक्के, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य जितेंद्र देशपांडे, पदव्युत्तर विभागाच्या संचालिका प्रो. डॉ. शैलजा बरूरे , रा. से. यो. कार्यक्रमाधिकारी डॉ . किरण चक्रे, डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे, अंतर्गत गुणवत्ता हमी मंडळाचे समन्वयक प्रा. डॉ. गंगाधर आकलोड, अंतर्गत तक्रार निवारण समिती प्रमुख प्रा. डॉ. संपदा कुलकर्णी,कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक श्रीकांत जवळगावकर, कार्यालयीन अधिक्षक श्रीहरीराम रामदासी, महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथि निमित्त सामाजिक कार्यकर्ते गोविंद गोरे यांच्या वतीने शासकीय रुग्णालयात बसवले १० पंखे...



नांदेड:-पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विष्णुपुरी, नांदेड येथे डिएमए ग्रुप,च्या वतीने वॉर्ड क्रमांक ६ च्या बाहेर १०पंखे बसविण्यात आले असून या उपक्रमाचे अनेकांनी कौतुक केले आहे.

गेल्या चार वर्षांपासून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथी निमित्त रुग्णालयात सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. यापूर्वी पहिल्या वर्षी ३ व्हीलचेअर, दुसऱ्या वर्षी प्रत्येक वॉर्डमध्ये नेब्युलायझर, तर तिसऱ्या वर्षी १० व्हीलचेअर उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. याच सामाजिक कार्याची परंपरा कायम ठेवत यावर्षी वॉर्ड क्रमांक ६समोर १० पंखे बसविण्यात आले आहेत. रुग्णालयातील रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला आहे.

बुधवार,१९ऑगस्ट २६ रोजी या कार्यक्रमाचे उद्घाटन अधिष्ठाता मा.श्री.डॉ.सुधीर देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले,यावेळी अधिष्ठाता माननीय डॉ.सुधीर देशमुख यांच्या सह उपस्थीत प्रमूख डॉक्टरांचा सत्कार करण्यात आला.' पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मातेंचे कार्य गोरगरीब जनतेची सेवा-हीच खरी ईश्वर सेवा आहे' या सेवाभावी विचारातून हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या कार्यक्रमासाठी यावेळी अधीक्षक डॉ.शिवानंद,उपअधीक्षक डॉ.अजय वराडे,साखरे,सखाराम लुटे,बालाजी सावंगीकर,भीमराव परोडवाड, सुभाष हाके,परिचारिका शिंदे,लक्ष्मीकांत कळसकर ,गोविंद मुंडकर,ऊर्मिला शेळके ,जयवंत सूर्यवंशी,ईश्वर गोरे यांच्या सह मान्यवर उपस्थिती होती.यावेळी सर्वांचे आभार सामाजिक कार्यकर्ते गोविंद गोरे यांनी मानले.

# रक्षाबंधनाआधीच तुटला प्रेमाचा धागा भावाच्या विरहाने बहिणीनेही सोडले प्राण

अर्धापूर (प्रतिनिधी): तुझं-माझं जमेना आणि तुझ्यावाचून करमेना... बहीण-भावाच्या अतूट प्रेमाची साक्ष देणारी ही उक्ती अर्धापूर तालुक्यात एका अत्यंत वेदनादायी घटनेने सिद्ध झाली आहे. भावाच्या निधनाची वार्ता ऐकून बहिणीनेही काही तासांतच प्राण सोडले. रक्षाबंधनाच्या सणाच्या तोंडावर घडलेल्या या दुर्दैवी प्रसंगामुळे संपूर्ण परिसरात प्रचंड हळहळ व्यक्त केली जात आहे.

अर्धापूर तालुक्यातील लोणी खुर्द येथील ज्येष्ठ नागरिक सुदामराव हानमंतराव शिंदे (वय ७०) यांचे गुरुवारी मध्यरात्री अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. भावाच्या निधनाची ही दुःखाद बातमी पुयणी (जि. नांदेड) येथे राहणाऱ्या त्यांच्या भगिनी अनुसयाबाई बालाजीराव पावडे (वय ६३) यांच्या कानी पडली. आपल्या लाडक्या भावाच्या विरहाचा धक्का त्यांना सहन झाला नाही. भावाच्या वियोगाने व्याकुळ झालेल्या अनुसयाबाईंची प्राणज्योत गुरुवारी सकाळच्या सुमारास मालवली.

एकाच दिवशी दोन गावात दुःखद घटना घडली दोघांवर अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेमुळे शिंदे आणि पावडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. सुदामराव शिंदे यांच्या पार्थिवावर गुरुवारी दुपारी २ वाजता लोणी खुर्द येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. तर काही तासांच्या अंतराने अनुसयाबाई पावडे यांच्यावर सायंकाळी ५ वाजता पुयणी येथे शोकाकुल वातावरणात अंत्संयसंस्कार पार पडले. अनुसयाबाईंच्या पश्चात पती, दोन मुले माधव पावडे व पोलीस जमादार संतोष पावडे, चार मुली, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे. बहीण-भावाच्या अथांग प्रेमाचा हा प्रसंग पाहून अंत्यसंस्कारास उपस्थित प्रत्येकाचे डोळे पाणावले होते. रक्षाबंधनाचे दिवस जवळ आले असताना घडलेल्या या घटनेने

# परळी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेचे थेट प्रक्षेपण व पत्रकारांसाठी स्वतंत्र गॅलरीची मागणी; अश्विन मोगरकर

परळी वैजनाथ

परळी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेचे कामकाज अधिक पारदर्शक व्हावे तसेच नागरिकांना नगरपरिषदेतील निर्णयप्रक्रियेची माहिती सहज उपलब्ध व्हावी, यासाठी सर्वसाधारण सभेचे थेट प्रक्षेपण सुरू करावे, अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे परळी शहर सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी परळी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे. यासोबतच नगरपरिषदेच्या सभागृहात पत्रकारांना सभेचे कामकाज व्यवस्थितपणे पाहता व वृत्तांकन करता यावे, यासाठी स्वतंत्र पत्रकार गॅलरीची व्यवस्था करण्यात यावी, अशीही मागणी त्यांनी केली आहे.

परळी शहराच्या विकासाच्या दृष्टीने नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभा अत्यंत महत्त्वाच्या असतात. या सभांमध्ये शहरातील विकासकामे, नागरिकांच्या समस्या, विविध योजनांची अंमलबजावणी, आर्थिक बाबी तसेच इतर महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेतले जातात. या निर्णयांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्वसाधारण सभेचे कामकाज नागरिकांना थेट पाहता यावे, यासाठी नगरपरिषदेच्या अधिकृत सोशल मीडिया माध्यमांवर व डिजिटल प्लॅटफॉर्मवर डळींशडीशराळपस करण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी, अशी मागणी अश्विन मोगरकर यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

आपल्या नगरपरिषदेने लोकहिताचे घेतलेले निर्णय परळीतील नागरिकांपर्यत जलद गतीने व पारदर्शक पद्धतीने पोचण्यासाठी सभागृहात पत्रकारांसाठी स्वतंत्र गॅलरी उपलब्ध करण्यात यावी यासाठी सभागृहात पत्रकारांना योग्य प्रकारे बसण्याची व सभेचे कामकाज स्पष्टपणे पाहण्याची व्यवस्था असणे गरजेचे आहे. त्यामुळे सभागृहात पत्रकारांसाठी स्वतंत्र, सुयोग्य व कायमस्वरूपी पत्रकार गॅलरी तयार करण्यात यावी. पत्रकारांना वृत्तांकनासाठी आवश्यक असलेली बैठक व्यवस्था उपलब्ध करून देण्यात यावी. यामुळे सभेतील चर्चेचे अचूक व वस्तुनिष्ठ वृत्तांकन नागरिकांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल, असेही निवेदनात अश्विन मोगरकर यांनी नमूद केले आहे.

आपल्या जिल्ह्यातील बीड, अंबाजोगाई सह अनेक नगरपरिषदा तसेच महाराष्ट्रातील अनेक महानगरपालिका, नगरपरिषद आपल्या सर्वसाधारण सभेचे थेट प्रक्षेपण आता करत आहेत. नगरपरिषदेच्या कामकाजात पारदर्शकता वाढविण्यासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे गरजेचे आहे. सर्वसाधारण सभेचे थेट प्रक्षेपण झाल्यास नागरिकांना आपल्या शहराशी संबंधित विषयांवर लोकप्रतिनिधी व प्रशासनामध्ये होणारी चर्चा थेट पाहता येईल. त्यामुळे नागरिकांचा नगरपरिषदेच्या कामकाजातील सहभाग वाढण्यास मदत होईल, असा विश्वास मोगरकर यांनी व्यक्त केला.

नगरपरिषदेने या मागण्यांची सकारात्मक दखल घेऊन सर्वसाधारण सभांचे थेट प्रक्षेपण



आणि पत्रकारांसाठी स्वतंत्र गॅलरी या दोन्ही बाबींवर तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी भाजपा शहर सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी केली आहे.



# शेतकऱ्यांच्या पीक विम्यासाठी केलेले जाधवयांचे माजलगाव येथील आंदोलन लेखी अश्वसाणानंतर स्थगित

माजलगाव / प्रतिनिधीः दैनिक समर्थ राजयोग

पीक विम्याच्या मागणीसाठी गेल्या सहा दिवसापासून सुरू असलेल्या उपोषणाची कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दखल घेत मुख्यमंत्री यांच्यासोबत लवकरच बैठक घेऊन शेतकऱ्यांच्या पीक विम्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. या

आश्वासनानंतर शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून विशाल विष्णु जाधव यांनी सुरू केलेले उपोषण तात्पुरते स्थगित केले आहे.एसडीएम गौरव इंगोले यांनी उपोषणस्थळी येऊन जाधव यांना पत्र दिले. शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा पीक विमा मिळालाच पाहिजे, ही मागणी कायम असून,शासनाने दिलेले आश्वासन पूर्ण करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# कमरेला गावठी कट्टा लावून अंबाजोगाईतील हॉटेलात जेवण

## स्थानिक गुन्हे शाखेने तरुणाला ठोकल्या बेड्या

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

**अंबाजोगाई: परळी रोडवरील एका हॉटेलमध्ये कमरेला गावठी कट्टा (पिस्तूल) लावून जेवण करत बसलेल्या तरुणाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रंगेहात पकडून बेड्या ठोकल्या. त्याच्या ताब्यातून एक गावठी पिस्तूल, मॅगझिन आणि दोन जिवंत काडतुसे असा एकूण ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंबाजोगाई परिसरात गस्त घालत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, परळी रस्त्यावरील शेपवाडी नजीक असलेल्या लक्ष्मीनारायण हॉटेलमध्ये एक संशयित इसम कमरेला शस्त्र लावून बसलेला आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसह हॉटेलच्या केबिनमध्ये छापा टाकला. तेथे जेवण करत असलेला तरुण शुभम भारत वाघमारे (वय १९, रा.नाकलगाव,ता. माजलगाव,जि.बीड) यास ताब्यात घेऊन त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्या कमरेला ३० हजार रुपये किमतीची एक सिल्व्हर काळ्या रंगाची गावठी बनावटीची पिस्तूल तसेच २ हजार रुपये किमती मॅगझिन व दोन जिवंत पितळी राउंड मिळून आले शस्त्र बाळगण्याचा कोणताही वैध परवाना नसल्यान पोलिसांनी हा शस्त्रसाठा जागीच जप्त केला.

या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार गोविंद व्यंकट भताने (वय ३६, रा. बीड) यांच्या फिर्यादीवरून आरोपी शुभम वाघमारे याच्याविरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात भारतीय शस्त्र अधिनियमाच्या कलम ३आणि २५ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. ही धडक कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली असून या गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक आनंद शिंदे करत आहेत.

# गर्दीचा फायदा घेत सोन्याचे गलसर लांबविणाऱ्या महिला आरोपीस अटक; अंबाजोगाई शहर पोलिसांनी महिन्याभरात गुन्हा उघडकीस आणला

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई बसस्थानकावर गर्दीचा फायदा घेत महिलेच्या पर्समधून सोन्याचे गलसर चोरी करणाऱ्या महिला आरोपीस अंबाजोगाई शहर पोलिसांनी ताब्यात घेतले असून, तिच्याकडून चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे कौशल्यपूर्ण तपास करत पोलिसांनी गुन्हा घडल्यापासून अवघ्या एका महिन्याच्या आत हा गुन्हा उघडकीस आणला.

दि. १५ जुलै२०२६ रोजी दुपारी सुमारे १.१५ वाजता अंबाजोगाई बसस्थानक येथे ही चोरीची घटना घडली. फिर्यादी जरीन ईस्माईल मुजावर (वय २४ वर्षे, रा. गाडिपुरा, धाराशिव) या आपल्या पतीसोबत धाराशिव येथे जाण्यासाठी बसमध्ये चढत होत्या. यावेळी बसस्थानकावर मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती.

याच गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या पर्समधून काळ्या मण्यांमध्ये गुंफलेले अंदाजे ८.९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गलसर, किंमत सुमारे ५६ हजार रुपये, चोरून नेले होते. याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात सीआर क्र. ३०९/२०२६, कलम ३०३ (२) इछड अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिसांनी तांत्रिक माहिती तसेच गोपनीय माहितीच्या आधारे



तपासाची चक्रे वेगाने फिरवली. कौशल्यपूर्ण तपासातून लातूर येथील एका महिला आरोपीकडून निष्पन्न करण्यात आला. पोलिसांनी संबंधित महिला महेक शेख रा लातूर आरोपीस ताब्यात घेऊन तिच्याकडून चोरीस गेलेले ८.९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गलसर हस्तगत केले. त्यामुळे चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल पोलिसांच्या हाती लागला आहे.या कारवाईमुळे अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात दाखल झालेला चोरीचा गुन्हा घटनेपासून एका महिन्याच्या आत उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस नाईक तेजस वावळे करीत आहेत.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली उल्लेखनीय कामगिरीही उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक सौ. चेतना तिडके आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.कारवाईत पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे, पोलीस हवालदार पांडुरंग काळे, पोलीस नाईक तेजस वावळे तसेच पोलीस अंमलदार हनुमंत चादर यांनी सहभाग घेतला.अंबाजोगाई बसस्थानकासारख्या गर्दीच्या ठिकाणी नागरिकांनी आपल्या मौल्यवान वस्तू व दागिन्यांची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# 'बीडची ओळख रेशीम उत्पादकांचा जिल्हा म्हणून व्हावी' – महेंद्रसिंग ढवळे

परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्याची ओळख केवळ 'ऊसतोड कामगारांचा जिल्हा' अशी न राहता आगामी काळात 'रेशीम उत्पादकांचा जिल्हा' म्हणून निर्माण व्हावी. यासाठी रेशीम विभाग, कृषी विभाग, ग्लोबल विकास ट्रस्ट आणि शेतकऱ्यांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य रेशीम संचालनालयाचे संचालक महेंद्रसिंग ढवळे यांनी केले.

## कृषीकुल येथे भव्य रेशीम उद्योग प्रशिक्षण; शासनाच्या योजना, आधुनिक तंत्रज्ञान आणि आर्थिक नियोजनावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन




ग्लोबल विकास ट्रस्टच्या कृषीकुल, सिरसाळा येथे केंद्रीय रेशीम बोर्ड, महाराष्ट्र राज्य रेशीम संचालनालय, जिल्हा रेशीम कार्यालय बीड, कृषी विभाग आणि ग्लोबल विकास ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रेशीम उद्योग प्रशिक्षण कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परळी तालुका कृषी अधिकारी डॉ. अर्चना नागरगोजे होत्या. केंद्रीय रेशीम बोर्डाचे वैज्ञानिक वीर शेट्टी आणि जिल्हा रेशीम अधिकारी एस. बी. वराट यांनीही शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणात रेशीम उद्योगासाठी उपलब्ध शासकीय योजना, 'सिल्क समग्र' योजना, अनुदान, पात्रता, आवश्यक कागदपत्रे आणि अर्ज प्रक्रिया याबाबत माहिती देण्यात आली. कृषी विभागाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन डॉ. अर्चना नागरगोजे यांनी दिले.

केंद्रीय रेशीम बोर्डाचे वैज्ञानिक वीर शेट्टी यांनी तुती लागवड, रेशीम किड्यांचे संगोपन, कीड व रोग व्यवस्थापन, तापमान-आर्द्रता नियंत्रण आणि स्वच्छतेच्या शास्त्रीय पद्धतींबाबत मार्गदर्शन केले. आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास रेशीम उत्पादनाची गुणवत्ता आणि उत्पादकता वाढू शकते, असे त्यांनी सांगितले.

महेंद्रसिंग ढवळे यांनी रेशीम उद्योगासोबत शेळीपालन, कुक्कुटपालन व दुग्ध व्यवसायासारखे पूरक व्यवसाय जोडून एकात्मिक कृषी उद्योग उभारण्याचे आवाहन केले. उत्पादनाबरोबरच मूल्यवर्धनाकडे शेतकऱ्यांनी लक्ष देऊन शेतीला अधिक फायदेशीर व्यवसायाचे स्वरूप द्यावे, असे त्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांनी मांडलेल्या अडचणी सोडविण्यासाठी रेशीम विभागाकडून आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने मुक्तेश्वर कडभाने यांनी संस्थेच्या रेशीम उद्योगातील उपक्रमांची माहिती दिली. संस्थेचे मार्गदर्शक मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून शेतकऱ्यांना प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन, शासकीय योजनांचा लाभ तसेच बँकांच्या माध्यमातून कर्जसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.


कार्यक्रमात राज्य शासनाचा शेतीनिष्ठ पुरस्कार प्राप्त शेतकरी बाबा सलगर यांच्यासह प्रगतिशील शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी विजय गव्हाणे, कृष्णा राठोड, दत्तात्रय काळे, हनुमंत भरडे, लहू राठोड, गणेश मुसळे, डॉ. प्रवीण मांजरे, सुधाकर पोळ यांच्यासह बीड व परभणी जिल्ह्यातील रेशीम व कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. सिरसाळ्यातील या प्रशिक्षणामुळे रेशीम उद्योगाच्या विस्ताराला नवी दिशा मिळून बीड जिल्ह्यात रेशीम उत्पादनाची चळवळ अधिक व्यापक

# शिक्षकांचे तालुकास्तरीय प्रशिक्षण उत्साहात संपन्न

परळी / प्रतिनिधी

मराठी माध्यमाच्या शासकीय आश्रमशाळा, जिल्हा परिषद शाळा तसेच खाजगी अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता सहावीला अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांना इयत्ता ६ वि नवीन अभ्यासक्रम प्रशिक्षण दोन टप्प्यांमध्ये देण्यात आले.प्रशिक्षणाचा दुसरा व अंतिम टप्पा दि. १७ ऑगस्ट २०२६ ते दि. २० ऑगस्ट २०२६ या कालावधीत शहरातील माऊंट लिटरा झी स्कुल, गंगाखेड रोड परळी येथे सकाळी ८:३० ते १२:३० या वेळेत घेण्यात आला.प्रशिक्षणात सुलभक म्हणून श्री. लोंढे एम.एन, श्री. ठोके आर.टी, श्री.कांबळे ए. आर, श्री.कुसुमकर ए. ए, श्री.गोचडे ए. जी, श्री.जोशी जी.के, श्री.कांगणे ए. एस यांनी मार्गदर्शन केले. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाईचे प्राचार्य अनिल मुरकुटे व गट शिक्षणाधिकारी कार्यालय परळीचे प्रशिक्षण प्रमुख श्री. दहिफळे सर यांच्या मार्गदर्शनाखली सुलभकांच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात आले.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०च्या अनुषंगाने नवीन अभ्यासक्रमानुसार इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय प्रशिक्षणाचा दुसरा व अंतिम टप्पा दि. २० ऑगस्ट २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. हे प्रशिक्षण मा. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व




प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाई चे प्राचार्य अनिल मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०नुसार शालेय शिक्षणामध्ये विविध शैक्षणिक बदल करण्यात येत असून, त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षकांना नवीन अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित विविध बाबींचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने आष्टी तालुक्यातील इयत्ता सहावीला अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी तालुकास्तरीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रशिक्षणात नवीन अभ्यासक्रमाची रचना व राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०ची उद्दिष्टे, विद्यार्थीकेंद्रित, कृती आधारित व अनुभवाधारित अध्यापन, कौशल्याधारित अध्ययन व चिकित्सक विचारांचा विकास, संवादकौशल्य, सर्जनशीलता व समस्या सोडविण्याची क्षमता वाढविणे, वर्गातील अध्ययन पातळी लक्षात घेऊन अध्यापन नियोजन, विविध शैक्षणिक साधनांचा प्रभावी वापर, विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी उपक्रम, अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी शिक्षकांची भूमिका यावर मार्गदर्शन करण्यात आले.चार दिवसांच्या या प्रशिक्षणामध्ये शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रशिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा व विविध अध्यापन तंत्रांचा आपल्या शाळांमध्ये प्रभावी वापर करावा, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला केंद्रस्थानी ठेवून अध्यापन करावे, यावर विशेष भर देण्यात आला.

# पिंपळगाव घाट ते पांढरेवाडी रस्ता अखेर खुला..!

## दोन जिल्ह्यांना जोडणारा दीड किलोमीटरचा मार्ग मोकळा, शेतकऱ्यांचा पिढ्यानपिढ्यांचा दळणवळणाचा प्रश्न मार्गी

उपोषणाला यश, तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या प्रत्यक्ष हस्तक्षेपाने फायलीतील रस्ता उतरला जमिनीवर

बीड प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील पिंपळगाव (घाट) ते धाराशिव जिल्ह्यातील पांढरेवाडी हा मागील ३० वर्षांपासून प्रलंबित असलेला सुमारे दीड किलोमीटरचा शेतरस्ता अखेर खुला झाला. माजी उपसरपंच संतोष तेलप यांनी १५ ऑगस्टपासून सुरू केलेल्या बेमुदत उपोषणाला यश आले.

तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल मंडळ अधिकारी सोनाली कदम, महसूल अधिकारी कमलेश निर्मळ, राजीव सानप, कोतवाल बिरलिंगे, तावरजा प्रकल्प अधिकारी आणि पोलीस प्रशासनाने प्रत्यक्ष घटनास्थळी कार्यवाही केली. तहसीलदार शेळके यांनी दिवसभर घटनास्थळी उपस्थित राहून दोन्ही बाजूंनी



चारी खोदून सुमारे ४५ फुटांचा रस्ता खुला केला.

भूमी अभिलेखचे मोजणी अधिकारी संजय जायभाये, अनिकेत बीडकर, एल. एम. पांचाळ, एस. एस. थिगळे यांनी रस्त्याची १०० फुटांची हद्द निश्चित केली. शेतकऱ्यांनी सामंजस्याची भूमिका घेतल्याने मार्ग मोकळा झाला असून, आता लोकसहभागातून रस्त्यावर मुरूम टाकण्याचे काम सुरू आहे.

या कार्यवाहीस नेकनूरचे पोलीस निरीक्षक मंगेश साळवे, पोलीस उपनिरीक्षक नितीन काकरवाल, विशाल क्षीरसागर, रामनाथ पुंडे यांनी कायदा व सुव्यवस्था राखत सहकार्य केले. तसेच संगमेश्वर प्रकल्पाचे तावरजा उपकार्यकारी अभियंता माणिकराव देशमुख, अभियंता श्री. कोकाटे व श्रीमती ऐश्वर्या यांनी मोजणीस मदत केली.

उपोषणस्थळी माजी जिल्हा परिषद सदस्य अशोक लोढा, शिवसंग्रामचे पांडुरंग आवारे, युवा उद्योजक दिनकर साठे, सुनील देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती प्रवीण देशमुख, पंचायत समिती सदस्य बाळासाहेब खरवडे, सरपंच संजय आसलकर आणि माजी सदस्य सयाजी हुंबे यांनी भेट देऊन पाठिंबा दिला.

रस्ता खुला झाल्याने वाढवणा, पिंपळगाव, रुईगव्हाण, माळेवाडी परिसरातील शेतकऱ्यांना शेतमाल वाहतूक, ट्रॅक्टर व शेती अवजारांच्या ने-आणीसाठी मोठा दिलासा मिळाला आहे.

# 'शेतकरी मित्र' निवडीसाठी इच्छुक शेतकऱ्यांनी अर्ज सादर करावेत

बीड प्रतिनिधी

आत्मा योजनेंतर्गत सन २०२६-२७ साठी बीड जिल्ह्यात ३९६ शेतकरी मित्रांची मानधन तत्त्वावर निवड करण्यात येणार आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी संबंधित सहाय्यक कृषी अधिकारी यांच्या मुख्यालयाच्या ग्राम कृषी विकास समितीकडे अर्ज सादर करावेत, असे आवाहन प्रकल्प संचालक आत्मा बीड सुभाष साळवे यांनी केले आहे.

शेतकरी मित्रांना दरमहा १,५०० रुपये म्हणजेच वार्षिक १८ हजार रुपये मानधन देण्यात येणार असून निवड दोन वर्षांसाठी राहणार आहे. निवड प्रक्रियेत ३० टक्के महिला शेतकरी मित्रांचा सहभाग अनिवार्य करण्यात आला आहे. महिलांसाठी गावांची लॉटरी पद्धतीने निवड केली जाणार आहे.

किमान पात्रता..

शेतकरी मित्राचे वय २५ ते ६० वर्षे, संबंधित गावातील रहिवासी व शेतकरी असणे आवश्यक असून किमान बारावी उत्तीर्ण असावे. त्याच्यावर कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नसावा. कृषी क्षेत्राची आवड, नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार, नाविन्यपूर्ण प्रयोग, उत्तम संवाद कौशल्य आणि कृषी विस्तारासाठी वेळ देण्याची तयारी अपेक्षित आहे.

निवड करताना पदव्युत्तर, पदवीधर, पदविकाधारक आणि बारावी उत्तीर्ण असा शैक्षणिक प्राधान्यक्रम राहणार आहे. समान शैक्षणिक पात्रता असल्यास अधिक गुण मिळविणाऱ्या उमेदवाराची निवड केली जाईल.

शेतकरी मित्रांमार्फत शेतकरी गटांची निर्मिती, शेतीशाळा, नैसर्गिक शेतीचा प्रचार, कृषी योजनांची माहिती, तंत्रज्ञानाचा प्रसार, डिजिटल शेतीशाळा व कृषी विभागाच्या विविध उपक्रमांत समन्वयाची कामे केली जाणार आहेत. तसेच कार्यक्षेत्रात शेतकरी सुविधा केंद्र स्थापन करणे आवश्यक राहणार आहे.

ही कागदपत्रे आवश्यक..

अर्जासोबत आधार कार्ड, ७/१२ उतारा, ८-अ उतारा, फार्मर आयडी, शैक्षणिक प्रमाणपत्र, चारित्र्य प्रमाणपत्र/ पोलीस व्हेरिफिकेशन, बँक पासबुकची प्रत आणि जात प्रमाणपत्र आवश्यक आहे.शेतकरी मित्रांची सेवा मानधन तत्त्वावर असून त्यांना कृषी विभागात कायमस्वरूपी नियुक्तीचा दावा करता येणार नाही. कामगिरीच्या मूल्यमापनानुसार पुढील वर्षासाठी सेवा सुरू ठेवली जाईल. गैरवर्तन, फौजदारी गुन्हा किंवा इतर कारणांमुळे सेवा समाप्त करण्याचा अधिकार सक्षम प्राधिकरणास राहणार आहे.

# कसारपेठ कुपटी येथे हातभट्टी शिंदी दारू अड्ड्यावर धाड

## मोह फुलासह साहित्य शिंदी दारू १४ हजार रुपयांचा मुद्देमाल नष्ट



माहूर /प्रतिनिधी

माहूर तालुक्यातील खेड्यापाड्यात हातभट्टी दारू अड्डे नष्ट करण्याच्या जबरी कारवाया होत असताना नवनवीन दारू गाळपणारे उदयास येत असल्याने पोलिसांनीही कंबर कसली असून पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली आती दुर्गम भागातील कसारपेठ आणि मौजे कुपटी येथे दारू गाळपण्याच्या तयारीत असलेल्या घर गोठ्यावर धाड टाकून हजारो रुपयांचे मोहफूल व रसायन तसेच शिंदि दारू नष्ट केल्याच्या दोन घटना दि २० रोजी दुपारी १२:३० वाजता घडल्या आहेत विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमा पोलीस अधीक्षक डॉ नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे पोलीस निरीक्षक देविदास चोपडे हे अवैध दारू विक्रे त्याविरुद्ध सतत धाडसत्र राबवीत आहेत मौजे कासारपेठ येथे हातभट्टी लावण्याचे तयारीत असल्याची माहिती मिळाल्याने पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी स्वत येथील एका शेतात असलेल्या गोठ्यावर धाड टाकली असता येथे मोहफूल बनवण्याचे रसायन व साहित्य एकूण मुद्देमाल ४ हजार रुपयाचा नष्ट करून एका विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे यावेळी बालाजी राठोड यांचे सह होमगार्ड उपस्थित होते तर मौजे कूपटी येथील एका घरात मोहफूल आणि रसायन असे १० हजार रुपयांचे साहित्य नष्ट करण्यात आले तर दुसऱ्या एका घरात केमिकलद्वारे बनविण्यात आलेली शिंदि दारू असल्याची माहिती मिळाल्याने पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेका प्रकाश गेडाम ज्ञानेश्वर खंदाडे यांनी येथे धाड टाकून ५ हजार रु ची शिंदी दारू सह रसायन साहित्य नष्ट करून दोघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे

हातभट्टी दारू काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात साहित्य लागत असल्याने दारू गळपणाऱ्यांनी नवीन शक्कल लढवत केमिकल पासून शिंदी दारू बनवून विक्री करण्याचा नवीन फंडा सुरू केल्याने पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांचे सह पोलिसांनी खबर लागताच धाडी टाकण्याचे सत्र सुरू केल्याने हातभट्टी शिंदी सह अवैधरित्या देशी दारू विकणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.




# आरोग्य सेवांच्या सक्षमीकरणासाठी प्रधान सचिवांचा कोल्हापूर दौरा; आरोग्य संस्थांची सखोल पाहणी व आढावा

कोल्हापूर / प्रतिनिधी

कोल्हापूर : महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक यांनी आज २१ ऑगस्ट रोजी जिल्ह्याचा दौरा करून जिल्ह्यातील शासकीय आरोग्य यंत्रणेचा सविस्तर आढावा घेतला.

सकाळच्या सत्रात डॉ. निपुण विनायक यांनी आरोग्य उपकेंद्र, कुर, प्राथमिक आरोग्य केंद्र, मडीलगे तसेच ग्रामीण रुग्णालय, गारगोटी येथे भेट देऊन तेथील आरोग्य सेवांचा तसेच सेवा, उपलब्ध साधनसामग्री, मनुष्यबळ,औषधसाठा, नोंदवही व रुग्णसेवेची पाहणी केली. यावेळी त्यांनी उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर, सेवा गुणवत्तेत सुधारणा आणि नागरिकांना वेळेत व सुलभपणे आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याबाबत त्यांनी आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना दिल्या. दुपारच्या सत्रात अमृतसिद्धी हॉल,कळंबा येथे जिल्हास्तरीय विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेमध्ये शासकीय आरोग्य संस्थांमार्फत नागरिकांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या १३ प्रमुख आरोग्य सेवांच्या प्रभावी अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या कार्यशाळेस मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन, मनपा आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड. यांची विशेष उपस्थिती होती.

या कार्यशाळेस जिल्हास्तरीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालयांचे अधीक्षक,जिल्हा व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका

# विक्रम साराभाई अवकाश प्रश्नमंजुषेत सिंदफणाच्या फैजाह शेखची राष्ट्रीय भरारी

## देशभरातील विद्यार्थ्यांतून अव्वल ३० विभागीय विजेत्यांमध्ये निवड

माजलगाव : (प्रतिनिधी)

सिंदफणा पब्लिक स्कूल, माजलगाव येथील इयत्ता सहावीची विद्यार्थिनी फैजाह अन्वर शेख हिने विक्रम साराभाई अवकाश प्रश्नमंजुषा २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले असून, देशभरातील विद्यार्थ्यांतून अव्वल ३० विभागीय विजेत्यांमध्ये तिची निवड झाली आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालय, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, दीक्षा आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या राष्ट्रीय स्तरावरील प्रश्नमंजुषेत अंतराळ मोहिमा, अंतराळ विज्ञान, उपग्रह, खगोलशास्त्र आणि अंतराळ तंत्रज्ञान या विषयांवर विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची कसोटी घेण्यात आली. फैजाहने आपल्या अभ्यासू वृत्ती, जिज्ञासा आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या बळावर मिळविलेल्या या यशामुळे सिंधफणा पब्लिक स्कूलच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे.



या प्रश्नमंजुषेसाठी देशाचे पाच विभाग करण्यात आले असून, त्यातून निवड झालेल्या अव्वल ३० विभागीय विजेत्यांना २३ ऑगस्ट २०२६ रोजी अहमदाबाद येथे होणाऱ्या राष्ट्रीय अवकाश दिनाच्या विशेष कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. भारताच्या अंतराळ संशोधनातील प्रगती, विविध अंतराळ मोहिमा आणि वैज्ञानिक उपलब्धींची विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष माहिती मिळण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण मानला जात आहे. फैजाहच्या या निवडीमुळे तिच्या वैज्ञानिक जिज्ञासेला नवी दिशा मिळण्याबरोबरच शाळेतील इतर विद्यार्थ्यांमध्येही विज्ञान, संशोधन आणि अंतराळ क्षेत्राबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे. तिच्या या कामगिरीचे माजलगावसह बीड जिल्ह्यातून कौतुक होत आहे.

फैजाहच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सिंधफणा पब्लिक स्कूलचे अध्यक्ष आमदार प्रकाशदादा सोळंके, सचिव मंगलाताई सोळंके, उपाध्यक्ष वीरेंद्र सोळंके, समन्वयक नीला देशमुख, प्राचार्य अन्वर शेख, उपप्राचार्य सुवर्णा शिंगणे, सौदागर साखरे तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या अंगी वैज्ञानिक दृष्टिकोन, जिज्ञासा आणि संशोधनवृत्ती विकसित करण्यासाठी शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांना मिळालेले हे यश प्रेरणादायी असल्याचे यावेळी सांगण्यात आले. फैजाहच्या राष्ट्रीय स्तरावरील या कामगिरीमुळे शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, तिची ही भरारी इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरली आहे.

# अॅड. पल्लवीताई सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्यसेवेचा उपक्रम

## मोफत फिजिओथेरपी कॅम्पचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा - सौ. मंगलाताई प्रकाश सोळंके

माजलगाव : (प्रतिनिधी) सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, माजलगाव यांच्या वतीने ड. पल्लवीताई सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त दोन दिवसीय भव्य मोफत फिजिओथेरपी कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांसाठी हा उपक्रम आरोग्याची अनोखी भेट ठरणार आहे.

हा विशेष आरोग्य कॅम्प रविवार, २३ ऑगस्ट आणि सोमवार, २४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी ४.३० वाजेपर्यंत जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, माजलगाव येथे आयोजित करण्यात आला आहे.

कॅम्पमध्ये कंबरदुखी, मानदुखी, गुडघेदुखी, सायटिका, फ्रोजन शोल्डर, पॅरालिसिस, स्पोर्ट्स इंज्युरी, लहान मुलांचे विकासात्मक विकार, वृद्धांमधील चालण्याच्या समस्या तसेच हाडे व स्नायूंशी संबंधित विविध दुखण्यांवर तज्ज्ञांकडून तपासणी, मार्गदर्शन व फिजिओथेरपी उपचार करण्यात येणार आहेत.

या कॅम्पचे वैशिष्ट्य म्हणजे तपासणी व सल्ला पूर्णपणे मोफत असून, अनुभवी प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली अंतिम वर्षाचे विद्यार्थी रुग्णांना उपचार सेवा देणार आहेत. आधुनिक फिजिओथेरपी मशिन्सच्या सहाय्याने उपचार करण्याबरोबरच प्रत्येक रुग्णाला आवश्यकतेनुसार घरच्या घरी करता येणाऱ्या व्यायामांची माहिती देण्यात येणार आहे.

आरोग्याच्या समस्या दुर्लक्षित न करता नागरिकांनी या मोफत कॅम्पचा लाभ घ्यावा, असे आवाहन माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ. मंगलाताई प्रकाश सोळंके यांनी केले आहे. नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क : ९८२३४८८८२० /



८२०८३००५३५ कॅम्पचे ठिकाण : जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, माजलगाव दिनांक : २३ व २४ ऑगस्ट २०२६ वेळ : सकाळी १० ते दुपारी ४.३०

# नवीन भाटवडगाव गट क्र. १६० मधील मुख्य वर्दळीच्या रस्त्याचे तीनतेरा!

## ना रस्ता, ना नाल्या; नागरिक त्रस्त - ग्रामपंचायत मात्र कर वसुलीत व्यस्त -

माजलगाव : प्रतिनिधी

माजलगाव शहरालगत असलेल्या भाटवडगाव ग्रामपंचायतीच्या हद्दीत झपाट्याने शहरीकरण होत असतानाच मूलभूत सुविधांची मात्र मोठी दुरवस्था झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. ग्रामपंचायत हद्दीतील नवीन माजलगाव परिसरातील गट क्र. १६० मधील मुख्य वर्दळीचा रस्ता अक्षरशः खड्डेमय झाला असून, या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. विशेष म्हणजे या भागात अद्याप योग्य रस्त्याची तसेच नाल्यांची सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.


भाटवडगाव ग्रामपंचायतीच्या हद्दीत नवीन माजलगाव शहराचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाला आहे. या परिसरात मोठमोठ्या इमारती उभ्या राहत असून, प्लॉटच्या किमतीही गगनाला भिडल्या आहेत. साधारणपणे तीस ते चाळीस लाख रुपयांपर्यंत प्लॉटची विक्री होत असल्याचे नागरिक सांगतात. वाढत्या बांधकामामुळे ग्रामपंचायतीच्या महसुलातही मोठी भर पडत असताना, त्याच प्रमाणात नागरिकांना मूलभूत सुविधा मिळणे अपेक्षित आहे.

मात्र, ज्या रस्त्यावरून दररोज मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते, तोच रस्ता खड्ड्यांनी व्यापलेला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना नाल्यांची सुविधा नसल्याने पावसाळ्यात परिस्थिती आणखी बिकट होते. अनेक वर्षांपासून या परिसरातील नागरिक ग्रामपंचायतीकडे रस्ता व नाल्यांच्या कामाची मागणी करत आहेत. वेळोवेळी या समस्येवर वृत्तपत्रांमधूनही प्रकाश टाकण्यात आला आहे. तरीदेखील ग्रामपंचायतीकडून ठोस कार्यवाही होत नसल्याने नागरिकांमध्ये संताप आहे.

महसूल वाढतोय; सुविधा मात्र कुठे?

भाटवडगाव ग्रामपंचायतीच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात शहरीकरण होत असून, बांधकामे, प्लॉट विक्री आणि विविध करांच्या माध्यमातून ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वाढ होत आहे. मात्र, महसूल वाढत असताना त्याचा उपयोग नागरिकांना आवश्यक असलेल्या रस्ते, नाल्या आणि इतर मूलभूत सुविधांसाठी का केला जात नाही? असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, ग्रामपंचायतीकडून विविध



कामांसाठी नागरिकांकडून शुल्क वसूल केले जात असल्याचीही चर्चा आहे. नाहरकत प्रमाणपत्र (छजउ) घेण्यासाठी एक हजार रुपये मोजावे लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे कर आणि विविध शुल्कांच्या माध्यमातून नागरिकांकडून वसुली करण्यात ग्रामपंचायत पुढे; मात्र प्रत्यक्ष विकासकामांच्या बाबतीत मात्र मागे, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत आहे.

वृत्तपत्रांतील बातम्यांनंतरही प्रशासन गप्प का?

गट क्र. १६० मधील रस्ता आणि नाल्यांच्या दुरवस्थेबाबत यापूर्वीही विविध वृत्तपत्रांतून बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. नागरिकांनी वारंवार मागणी करूनही प्रश्न कायम असल्याने ग्रामपंचायत प्रशासन नेमके कोणाच्या प्रतीक्षेत आहे? असा सवाल या भागातील मतदार व नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

ग्रामपंचायतीने केवळ कर वसुलीवर भर न देता नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, गट क्र. १६० मधील मुख्य रस्त्याचे तातडीने मजबुतीकरण करावे तसेच नाल्यांची व्यवस्था करून पावसाळ्यातील समस्या कायमस्वरूपी दूर करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे.

# लाडकी बहीण योजना : सरकारची तारणहार की सत्तेसाठी डोकेदुखी?

मुंबई : (प्रतिनिधी) मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही महायुती सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनांपैकी एक मानली जाते. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील कोट्यवधी महिलांना आर्थिक मदत देण्याचे आश्वासन सरकारने दिले आणि या योजनेला मोठा प्रतिसादही मिळाला. मात्र, आता लाभार्थी पडताळणी आणि ई-केवायसीच्या प्रक्रियेनंतर मोठ्या संख्येने महिलांची नावे यादीतून वगळण्यात आल्याचा आरोप होत असल्याने हीच योजना सरकारच्या अडचणीचे कारण ठरताना दिसत आहे.

काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी या मुद्द्यावर सरकारवर जोरदार टीका केली आहे. त्यांच्या दाव्यानुसार, तब्बल ९२.१० लाख महिलांना योजनेतून वगळण्यात आले असून लाभार्थींची संख्या सुमारे २ कोटी ४८ लाखांवरून १ कोटी ६५ लाखांपर्यंत कमी झाली आहे. ही आकडेवारी सरकारच्या धोरणावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी असल्याचे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.



वडेट्टीवार यांनी सोशल मीडियावरील पोस्टमधून सरकारवर निशाणा साधताना, निवडणुकीपूर्वी महिलांना केंद्रस्थानी ठेवून राबविलेली योजना आता सरकारला आर्थिकदृष्ट्या डोईजड होत असल्याचा आरोप केला आहे. अर्थात, विरोधकांकडून करण्यात आलेले हे आरोप आणि मांडण्यात आलेली आकडेवारी यांची अधिकृत सरकारी स्तरावर सविस्तर पडताळणी होणेही तितकेच आवश्यक आहे.

मात्र, या संपूर्ण प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा प्रश्न हा आहे की लाभार्थी महिला अपात्र ठरली असेल तर तिचे नाव का वगळण्यात आले, याचे कारण तिला स्पष्टपणे सांगितले गेले का? एखाद्या महिलेने ई-केवायसी केली असेल, कागदपत्रे दिली असतील आणि त्यानंतरही तिचे नाव यादीतून वगळले गेले असेल, तर तिला आपल्या कागदपत्रांमधील किंवा पात्रतेतील त्रुटी दुरुस्त करण्याची संधी मिळाली पाहिजे.

कारण योजना ही केवळ सरकारची घोषणा नसते; ती लाखो नागरिकांच्या अपेक्षांशी जोडलेली असते. एखाद्या गरीब महिलेच्या खात्यात दर महिन्याला येणारी आर्थिक मदत तिच्यासाठी किरकोळ रक्कम नसू शकते. घरखर्च, मुलांचे शिक्षण, औषधोपचार किंवा दैनंदिन गरजा भागवण्यासाठी ती मदत महत्त्वाची ठरू शकते. त्यामुळे अचानक नाव वगळले गेल्यास त्या महिलेच्या मनात निर्माण होणारा प्रश्न स्वाभाविक आहे-माझे नाव का वगळले?

दुसरीकडे, जर काही लाभार्थी खरोखरच योजनेसाठी अपात्र असतील, तर त्यांच्यावर कारवाई होणे आवश्यकच आहे. मात्र मग आणखी एक प्रश्न उपस्थित होतो-जे लोक अपात्र होते, त्यांची नावे यापूर्वी लाभार्थी यादीत आली कशी आणि त्यांना इतके दिवस लाभ मिळाला कसा? पात्रता तपासणीची जबाबदारी सरकारच्या यंत्रणेची असेल, तर चुकीच्या पद्धतीने लाभ मिळाल्याची जबाबदारी केवळ लाभार्थ्यांवर टाकून प्रश्न सुटणार नाही.

याचबरोबर समाजातील आर्थिकदृष्ट्या सक्षम महिलांना लाभ मिळत असेल आणि दुसरीकडे गरजू महिलांना वगळले जात असेल, तर त्याचीही निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. कोणत्या निकषांवर नावे वगळण्यात आली, किती महिलांना कोणत्या कारणामुळे अपात्र ठरवण्यात आले आणि वगळलेल्या महिलांना अपील किंवा दुरुस्तीची संधी दिली आहे का, याची माहिती सरकारने पारदर्शकपणे जनतेसमोर मांडणे गरजेचे आहे.

लाडकी बहीण योजनेचा राजकीय फायदा झाला का, हा वेगळा राजकीय प्रश्न आहे. निवडणुकीच्या काळात या योजनेची चर्चा मोठ्या प्रमाणावर झाली, हे वास्तव आहे. मात्र महिलांना लाभ देणारी योजना राजकीय हेतूने आणली गेली किंवा नाही, यापेक्षा आजचा प्रश्न अधिक गंभीर आहे-ज्या महिलांना या योजनेचा आधार मिळाला, त्यांचा विश्वास सरकार कायम ठेवणार आहे का?

महायुती सरकारसाठी ही योजना केवळ आर्थिक तरतुदीचा विषय नाही; ती आता राजकीय विश्वासाचा विषय बनली आहे. कारण ज्या योजनेमुळे सरकारला महिलांचा मोठा पाठिंबा मिळाला, त्याच योजनेतील लाभार्थी कमी होत असल्याची चर्चा सुरू झाली तर त्याचा राजकीय परिणाम होणे स्वाभाविक आहे.

वगळण्यात आलेल्या सर्व महिला श्रीमंत आहेत, असे मानणेही योग्य ठरणार नाही. त्याचप्रमाणे योजनेत राहिलेल्या प्रत्येक महिलेची पात्रता संशयास्पद आहे, असेही म्हणता येणार नाही. त्यामुळे राजकीय आरोप-प्रत्यारोपांपेक्षा पारदर्शक लाभार्थी पडताळणी आणि प्रत्येक अपात्रतेचे स्पष्ट कारण हीच या प्रश्नाची खरी गरज आहे.

सरकारने या योजनेबाबत सर्व आकडेवारी जाहीर करावी, किती महिलांची नावे वगळली, कोणत्या कारणांमुळे वगळली, त्यापैकी किती महिलांना पुन्हा पात्र ठरवण्यात आले आणि किती महिलांना पुनर्विचाराची संधी दिली, याची माहिती जनतेसमोर ठेवावी. तसेच पात्र असूनही नाव वगळलेल्या महिलांसाठी स्वतंत्र तक्रार निवारण व्यवस्था उभी करावी.

कारण महिलांना 'लाडकी बहीण' म्हणणे सोपे आहे; पण त्यांचा विश्वास टिकवणे अधिक महत्त्वाचे आहे.आज सरकारच्या विरोधात विरोधक किती मोठी रणनीती आखतील, हे भविष्यात स्पष्ट होईल. मात्र एक गोष्ट नक्की-ज्या योजनेने सत्तेची वाट सुकर केली, तीच योजना जर पारदर्शकतेच्या अभावामुळे महिलांच्या नाराजीचे कारण बनली, तर तिचा राजकीय परिणाम सरकारला निश्चितच भोगावा लागू शकतो.

लाडकी बहीण योजना ही कोणत्याही पक्षाची मालमत्ता नाही. ती राज्यातील महिलांसाठीची योजना आहे. त्यामुळे तिच्यातील प्रत्येक पात्र महिलेला न्याय मिळणे, अपात्र लाभार्थींना दूर करणे आणि ज्यांचे नाव चुकीने वगळले गेले आहे त्यांना पुन्हा संधी देणे-हीच सरकारची खरी कसोटी आहे.

राजकारण येते-जाते; पण जनतेचा विश्वास एकदा तुटला तर तो पुन्हा मिळवणे कठीण असते. लाडकी बहीण योजनेच्या बाबतीत सरकारसमोर आज नेमके हेच आव्हान उभे राहिले आहे.

-प्रदीप कुलकर्णी - माजलगाव